
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १६ ◆ अंक २३१
www.ramprahar.com
शुक्रवार, ८ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नवी मुंबईतील १४ गावांना दिलासा; मनपात समावेश/२
महिला दिनी गड किल्ल्यांवर आज शुल्कमाफ/५
इंग्लंडविरुद्ध कसोटीत पहिल्या दिवशी भारताचे वर्चस्व/८

## सामान्यांना स्वस्त एलपीजी सिलिंडरसाठी वर्षभर मुदतवाढ

**मुंबई** : मोदी सरकारने एलपीजी सिलिंडरवर मिळणारे अनुदान एका वर्षासाठी वाढवले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी ही माहिती दिली. एलपीजी सिलिंडर रिफिलिंग करण्यासाठी सरकार सर्वसामान्य ग्राहकांना प्रति सिलिंडर २०० रुपये सबसिडी देते. त्यामुळे त्यांना ११०० रुपयांचा घरगुती एलपीजी सिलिंडर ९०० रुपयांना उपलब्ध आहे, तर प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना एकूण ५०० रुपये अनुदान दिले जाते. म्हणजेच पीएम उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना एलपीजी रिफिलसाठी फक्त ६०० रुपये द्यावे लागतात. सामान्य एलपीजी ग्राहक असो किंवा पीएम उज्ज्वला योजनेचा लाभार्थी असो दोघांनाही ३१ मार्च २०२५पर्यंत सिलिंडरवर सबसिडी मिळत राहील.




*स्वकर्तृत्वावर महिला आज विविध क्षेत्रांत प्रगती करीत आहेत. पंखातील बळाच्या जोरावर स्त्री जेव्हा भरारी घेते, तेव्हा कुटुंबासह समाजाला नवी दिशा मिळत असते. अशा महिला समाजासाठी नुसत्या आदर्शच नसतात, तर त्या समाजाचे भवितव्यदेखील असतात. एकेकाळी चूल आणि मूल या संकल्पनेत अडकलेल्या महिला, मुली शिकल्या. त्याचे परिणामस्वरूप तळागाळातील आदिवासी स्त्री आज भारताच्या राष्ट्रपती म्हणून सर्वोच्च पदावर विराजमान आहे. जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांच्या कामगिरीचा दै. रामप्रहरच्या टीमने घेतलेला आढावा...*



### मुख्याध्यापिका राज अलोनी

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जातात. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असताना त्यांनी आपल्या शाळेला एका वेगळ्या उंचीवर नेले आहे. नुकतेच या शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. **(पान ६ वर..)**



### राष्ट्रीय चित्रकार चंद्रकला कदम

अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रकला कुमार कदम यांना तेजस्विनी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चंद्रकला यांनी आतापर्यंत अनेक मान्यवर संस्थांसाठी तैलचित्रे तयार केलेली असून त्यात भारतीय संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात, महाराष्ट्र विधान भवनात, उच्च न्यायालयात, विद्यापीठात लावलेल्या कलाकृतींचा समावेश आहे. गुजरात विधान भवनातही चंद्रकला यांनी तयार केलेले तैलचित्र आहे. **(पान ७ वर..)**



### कमर्शियल पायलट प्राप्ती ठाकूर

रायगड जिल्ह्यात आगरी समाजातील पहिली महिला पायलट होण्याचा मान माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पुतणी प्राप्ती राज ठाकूर यांनी वयाच्या २२व्या वर्षी मिळविला आहे. त्या कमर्शियल पायलट झाल्या आहेत. उरण तालुक्यातील भेंडखळ येथील आणि सध्या नेरूळ (नवी मुंबई) येथे वास्तव्यास असलेल्या प्राप्ती ठाकूर यांनी २०१९मध्ये बारामती येथील कार्व्हर एव्हिएशन अकॅडमीमध्ये अॅडमिशन घेतले होते. **(पान ६ वर..)**



### आदर्श महिला निलिमा भोसले

भारतीय महिलांसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले कोणाएका देवीपेक्षा कमी नाहीत. सावित्रीबाईंनी स्त्रियांना दिलेल्या या ऊर्जेचा स्रोत महाडच्या निलिमा राजेय भोसले यांच्या अंगी दिसून येतो. पतीच्या निधनानंतर फोर्कलिफ्टसारखा नवीन आणि महिलांनी न केलेल्या व्यवसायात निलिमा भोसले यांनी केलेले काम व मिळवलेले प्राविण्य कौतुकास्पद आहे तसेच एक महिला म्हणून त्यांची वाटचाल आदर्शवत आहे. **(पान ७ वर..)**

# रायगडसाठी २६०० कोटींचे करार

## राज्य शासन उद्योजकांच्या सदैव पाठीशी -पालकमंत्री उदय सामंत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने मोठ्या उद्योजकांबरोबरच छोट्या उद्योजकांनादेखील सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. उद्योजकांवर कुठलेही संकट येणार नाही याची राज्य शासन काळजी घेईल, अशी ग्वाही राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि.७) पनवेल येथे दिली. जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत ते बोलत होते. या वेळी त्यांच्या उपस्थितीत रायगड जिल्ह्यासाठी २६०० कोटी रुपयांचे १७ सामंजस्य करार करण्यात आले.




पनवेल येथील विरुपक्ष मंगल कार्यालयात आयोजित गुंतवणूक परिषदेस व्यासपीठावर आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, कोकण विभाग ठाणे उद्योग सहसंचालक विजू सिरसाठ, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक जी. हरळय्या उपस्थित होते.

या वेळी पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, गुंतवणूकदार व व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याकरिता जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन उद्योग विभागामार्फत करण्यात येत आहे. जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्हास्तरीय गुंतवणूकदार आणि व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या व राज्याच्या विकासाला चालना देणे हा या परिषदेचा उद्देश आहे तसेच राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७पर्यंत एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहचविणे हे राज्याचे मुख्य ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषद २०२३ यांनी सुचविलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी विविध उपाययोजना अमलात आणण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर निर्यात व विकासाचे केंद्र म्हणून जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करून जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी या गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. **(पान २ वर..)**

# विकासामुळे पनवेल महापालिका अग्रेसर

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

### प्राथमिक आरोग्य केंद्र, आपला दवाखाना आणि आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सातत्याने आरोग्यसेवा पुरविणाऱ्यावर माझा भर राहिला आहे. आयुक्त गणेश देशमुख यांनी पनवेल महापालिकेच्या सर्वंकष विकासासाठी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रातील इतर महापालिकांपेक्षा ही तरुण महापालिका आहे. कमी वेळेत केलेल्या विकासामुळे ती अग्रेसर बनत चालली असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि.७) केले.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांना प्राथमिक उपचारांच्या उत्तम सुविधा मिळण्याच्या दृष्टीने तळोजातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, नावडे येथील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि तोंडरे येथील नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी आयुक्त गणेश देशमुख यांनी महापालिका सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवूनच सगळी कामांची धोरणे ठरवत आहेत, असे सांगितले.

या कार्यक्रमास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, पापा पटेल, भाजप नेते सुरेश खानावकर, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, गाव अध्यक्ष भूपेश खानावकर, विशाल खानावकर, मदन खानावकर, शुभम खानावकर, **(पान २ वर..)**



## आमदार महेश बालदी यांच्या निधीतून चांभार्ली आणि पराडे येथे नवीन स्मशानभूमी

**मोहोपाडा : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून चांभार्ली आणि पराडे येथे ३० लाख रुपये खर्च करून नवीन आरसीसी स्मशानभूमी बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन गुरुवारी (दि.७) झाले.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे, हभप तुकाराममहाराज मुंढे, भूषण पारंगे, आकाश जुईकर, नारायण तांडेल, सरपंच प्रदीप पाटील, उपसरपंच समीर पाटील, माजी सरपंच बाळी कातकरी, प्रवीण जांभळे, सदस्य स्वप्नील जांभळे, **(पान २ वर..)**

## चौथे महिला धोरण आज होणार जाहीर

**मुंबई** : महिलांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय असलेले व या ध्येयासाठी आखण्यात आलेल्या योजनांच्या अंमलबजावणीवर भर देणारे राज्याचे चौथे महिला धोरण महिला दिनी म्हणजेच शुक्रवारी (दि.८) जाहीर करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालविकास विभागाने हे महिला धोरण तयार केले आहे.









# नवी मुंबईतील १४ गावांना दिलासा

## महापालिकेत समोवश करण्याचा निर्णय जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील १४ गावांचा महापालिकेत समावेश करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि.७) जाहीर केला. उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमाकुल करण्याबाबत येत्या मंत्रिमंडळात निर्णय घेण्याचे जाहीर करतानाच संत सावळाराम स्मारकासाठी जागा देण्याची कार्यवाही गतिमान करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी कल्याण डोबिवली, उल्हासनगर, नवी मुंबईतील १४ गावे यासंदर्भात सविस्तर आढावा बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी सार्वजनिक बांधकाममंत्री रविंद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत



शिंदे, आमदार राजू पाटील, डॉ. बालाजी कल्याणकर यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

या बैठकीत २७ गावे, कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील पुनर्विकास, १४ गावांचा नवी मुंबई महापालिकेत समावेश, उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमाकुल करणे, संत सावळाराम स्मारकासाठी जागा आदी विषयांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

नवी मुंबई महापालिका हद्दीत १४ गावांचा समावेश करण्याची भूमिपुत्रांची मागणी मान्य केली असून त्याबाबत अधिसूचना काढण्यात आली आहे. आता या गावांमध्ये नवी मुंबई महापालिकेप्रमाणे विकास कामे होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील २७ गावांमध्ये मालमत्ताकराचा विषय प्रलंबित होता. त्यावर मार्ग काढत २०१७च्या दराप्रमाणे आता कराची आकारणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. जीर्ण झालेल्या इमारतींचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करण्याबाबतचा निर्णय येत्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

# दादर सागरी पोलीस ठाणे नूतन इमारतीचे भूमिपूजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील दादर सागरी पोलीस ठाणे नुतन इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते गुरुवारी (दि.७) झाले. या वेळी आमदार रविशेठ पाटील, विशेष पोलीस महानिरिक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अधीक्षक अभियंता अनिता परदेशी यांच्यासह पोलीस अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री सामंत म्हणाले, पोलीस विभाग अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवतांना नेहमी सर्वोत्तम कामगिरी करून



आपली प्रतिमा उंचावावी. सागरी सुरक्षा ही अतिशय महत्त्वाची असून त्यासाठी आवश्यक सुविधा देण्यात येत आहेत. जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन ही स्मार्ट पोलीस स्टेशन असून त्याचा आदर्श इतर जिल्ह्यांनी घ्यावा. जिल्ह्यातील प्रकल्पांसाठी भूसंपदान करताना स्थानिकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, असेही पालकमंत्री सामंत यांनी सांगितले.

आमदार रविशेठ पाटील यांनी, दादर सागरी पोलीस स्टेशन होत आहे ही खूप महत्त्वाची बाब असल्याचे सांगितले. विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन इमारतीसाठी तसेच अत्यावश्यक साधन सामुग्रीसाठी निधी उपलब्ध होत असल्याचे सांगून सागरी सुरक्षेसाठी रायगड पोलीस दल कटिबद्ध आहे, असे सांगितले.

# रोह्यात लाचखोर सहाय्यक फौजदारास पकडले

### लाचलुचपत विभागाने सापळा रचून केली कारवाई

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार गोविंद रघुनाथ मदगे यांना सहा हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून ही कारवाई केली.

लाचलुचपत विभाग रायगचे पोलीस उपअधीक्षक शशिकांत पाडावे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदारांचे वडील कांतीलाल तुकाराम वाघमारे यांनी त्यांची पत्नी प्रवीणा कांतीलाल वाघमारे यांच्याविरुद्ध सोमवारी विवाद व झटापट केली. याबाबतची तक्रार रोहा पोलिसांत दिली होती. रोहा पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची तक्रार नोंद करण्यात आली होती. हे प्रकरण कौटुंबिक व अदखलपात्र स्वरूपाचे असूनदेखील तक्रारदारांची आई प्रवीणा वाघमारे हिला अटक करावी लागेल, असे तक्रारदारांना बोलावून घाबरविण्यात आले व तक्रारीत मदत करण्यासाठी १० हजार रुपये लाचेची मागणी सहाय्यक फौजदार गोविंद मदगे यांनी केली. तडजोडीअंती सहा हजार लाच देण्याचे ठरले.

रोहा बाजारपेठ पोलीस वाहतूक चौकीजवळ लाचलुचपत विभागाच्या शशिकांत पाडावे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, शरद नाईक, हवालदार महेश पाटील, कौस्तुभ मगर यांच्या पथकाने सापळा रचून गोविंद मदगे यांना ही लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. पुढील कारवाई रोहा पोलीस ठाणे येथे करण्यात येत असल्याची माहिती पाडावे यांनी दिली.

# सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना उपाध्यक्षांची भेट

## प्रकल्पांच्या वेगवान अंमलबजावणीचे निर्देश

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी गुरुवारी (दि.७) सिडकोच्या विविध प्रकल्पांना भेट दिली. त्यांनी प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने व्हावी याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, दिलीप ढोले, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, मुख्य नियोजनकार (नवी मुंबई) रवींद्र मानकर, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) शीला करुणाकरन, अतिरिक्त मुख्य अभियंता प्रभाकर फुलारी, जनसंपर्क अधिकारी



प्रिया रातांबे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिडकोचे गृहनिर्माण, प्रस्तावित युनिटी मॉल, लॉजिस्टिक्स पार्क इ. प्रकल्प हे प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पांच्या आढावा घेण्याकरिता प्रकल्प स्थळांना भेट देण्यात आली. सामान्य नागरिक, प्रकल्पबाधित अशा विविध घटकांच्या हिताच्या दृष्टीने हे प्रकल्प महत्त्वाचे असल्याने या प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने व नियोजित वेळेत व्हावी याकरिता संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत, असे त्यांनी या वेळी सांगितले.

# जाणता राजा महानाट्याचे पनवेलमध्ये मोफत प्रयोग

**रायगड** : सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आणि रायगड जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०व्या राज्यभिषेक वर्षानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित जाणता राजा महानाट्याचे आयोजन १० ते १२ मार्च या कालावधीत पनवेल येथे सायंकाळी ६ ते १० या वेळेत करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची, नितीची, चारित्र्याची, विचारांची व कार्यकुशलतेची महती विशेषकरून तरुण पिढीला मार्गदर्शक ठरावी, त्यांच्या गौरवशाली वारशाला प्रसिद्धी मिळावी तसेच त्यांचे विचार महानाट्याद्वारे जिल्ह्यातील जनमानसांपर्यंत पोहचावे यासाठी या महानाट्याचे आयोजन पनवेलमधील कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी येथे करण्यात आले आहे. या महोत्सवात लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या पत्नी व आई वडील, शासकीय अधिकारी-कर्मचारी, शालेय विद्यार्थी, मान्यवर व नागरिक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे; तर या महानाट्यासाठी प्रवेश विनामूल्य असून जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

# उरण नगर परिषदेची अतिक्रमणाविरोधात कारवाई

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथकाने शहराच्या बाजारपेठेतील राजपाल नाका, मुसाफिर खाना, जरिमरी मंदिर रोड, तहसील कार्यालय रोड येथे दुकानदारांनी केलेल्या अतिक्रमणविरोधात कारवाई गुरुवारी (दि.७) केली. ही कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

रस्त्याच्या दोन्ही बाजूस हातगाड्या, भाजीवाले आदींना हलविण्यात आले. या हातगाड्यांमुळे वाहतुकीला अडथळा होत असल्याने ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत पथक प्रमुख नरेंद्र उभारे, हरेश जाधव, महेंद्र



साळवी, धनेश कासारे, अनिल कासारे, सुनील जाधव, कैलास राठोड, सिद्धार्थ कासारे, दिलीप गायकवाड, नरेश पावसकर, मेहबुब मकानदार व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**बाजारपेठेतील रस्त्यालगत असणारी दुकाने ज्यांनी उरण नगर परिषदेच्या जागेवर केलेल्या अतिक्रम वेळोवेळी हरविण्यात येईल. वेळोवेळी अतिक्रमण भरारी पथक काम करणार आहे. बाजारपेठेतील रस्त्यावरील केलेल्या अतिक्रमणे उठविण्यात येईल.**
**-समीर जाधव, मुख्याधिकारी**

# सावरोली येथे भंगाराच्या गोदामाला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली-पेण मार्गावरील सावरोली निफान येथील टाटा स्टील कंपनीसमोर असणाऱ्या गोदामाला गुरुवारी (दि.७) दुपारी २ वा. सुमारास आग लागली.

याची माहिती स्थानिकांनी अग्निशमन दलाला दिल्यानंतर खोपोली अग्निशमन दलाच्या जवानांसह टाटा स्टील व आसपासच्या पाच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. सुमारे अर्धा तास आगीशी झुंज देत दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नाने आगीवर नियंत्रण मिळवीत आग आटोक्यात आणली.

अशा घटना वारंवार घडत आहेत. या घटना तालुक्यात चिंतेचा विषय बनला आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत बुधवारी (दि.६) लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे महापालिकेच्या वतीने पर्यावरणविषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले, तसेच ऊर्जा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

या वेळी प्राचार्य अविनाश कुलकर्णी, समन्वयक अर्चना माथूर, समन्वयक सोनाली पवार,सहाय्यक शिक्षक अमृता गुरव, लिपीक रोशन पाटील तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच पद्धतीने महापालिकेच्या वतीने विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.




पान १ वरुन

## रायगडसाठी २६०० कोटींचे करार

समुद्र किनारी असलेल्या जिल्ह्यामध्ये उद्योजक गुंतवणूक करीत आहेत. स्थानिक स्तरावर एक लाख कोटी गुंतवणूक महाराष्ट्रात करण्यात आली आहे. ५० लाखांच्या प्रोजेक्टलादेखील रेड कार्पेट मिळाले आहे. छोटे व स्थानिक उद्योजक शासनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. अटल सेतूमुळे रायगड जिल्ह्यात पायाभूत सोयीसुविधांचा विकास होणार आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, समृद्धी महामार्गामुळे उद्योगवाढीला चालना मिळणार आहे. देशात परकीय गुंतवणूक आणणारे महाराष्ट्र राज्य एक नंबरला आहे, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे १८ ते १९ हजार उद्योजक बनविण्याचे स्वप्न साकार होणार आहे. उद्योगाची भरभराट होण्यासाठी उद्योजकांनी उद्योजक तयार करावेत. असे केले तर बेरोजगारी दूर होईल, असे सांगून उद्योजकांवर कुठलेही संकट येणार नाही याची काळजी शासन घेईल, असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ यांनी प्रास्तविक केले. दरम्यान, उद्योग व गुंतवणुकीमुळे जिल्ह्यात रोजगार व पूरक व्यवसायांना चालना मिळणार आहे.

## विकासामुळे पनवेल महापालिका अग्रेसर

नीरज खानावकर, प्रकाश म्हात्रे, महेश पाटील, राम पाटील, अशोक पाटील, महिला मोर्चा प्रभाग अध्यक्ष काजल पाटील, अमृता पाटील, अशोक साळुंखे, श्रीनाथ पाटील, वसंत पाटील, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, इतर अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल महापालिकेने नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यावर नेहमीच भर दिला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर असून सर्व ठिकाणी कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. मंजूर नऊ आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांपैकी आठ उपकेंद्र कार्यन्वित आहेत, तर हिंदूहृसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना खारघर सेक्टर १२ व आज नावडे ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी सुरू करण्यात आला आहे.

## आमदार महेश बालदी यांच्या निधीतून चांभार्ली आणि पराडे येथे नवीन स्मशानभूमी

मोहन मुंढे, धनाजी जांभळे, मिलिंद मुंढे, दीपक कांबळे, नरेश गोपाळे, सचित कुरंगळे, विशाल मुंढे, कुंडलिक जांभळे, भीमसेन जांभळे, गणू मुंढे, जगन्नाथ जांभळे, मधुकर जांभळे, ज्ञानेश्वर जांभळे, मारूती जांभळे, चंद्रकांत जांभळे, शंकर मुंढे, सागर सुखदरे, ग्रामविकास अधिकारी अजय फोफेरकर, दर्शन पोलेकर, नथू सवार, यशवंत सवार, देहू कातकरी, सुरेश कातकरी, कुसुम कातकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.




महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग
पिन कोड - ४०२ २०१

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :-(०२१४१)२२२०८४/२२५०९६

ई-निविदा सूचना क्र.६९ सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पुर्ण करतील त्यांचे कडून)/नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | Construction of High-level Major Bridge across Amba River Connecting NH- 66 and SH-87 On Bense Bandar to Koleti approaches and Land Acquisition VR-3 in tal Pen Dist. Raigad | 13,06,69,732/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ११.०३.२०२४ (स.१०.००) ते दिनांक २५.०३.२०२४ (सं.१८.००)

निविदापुर्व बैठक :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. १९.०३.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता

ई-निविदा उघडणे :- दिनांक २८.०३.२०२४ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
(ज.ई.सुखदेवे)
कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, अलिबाग,
जि.रायगड

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/१३९३/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, अलिबाग – ४०२ २०१
दिनांक :- ४.०३.२०२४

# सायबर गुन्हेगारांना पोलिसांनी केले जेरबंद



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीमधील व्यावसायिकाला फेसबुकद्वारे संपर्क साधून त्यांना फॉरेक्स ट्रेडींग आणि क्रिप्टो ट्रेडींगमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांच्याकडून तब्बल ६०.२३ लाख रुपये उकळणाऱ्या दोन सायबर चोरांना नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलिसांनी उत्तर प्रदेश येथून अटक केली आहे.

या कारवाईत अटक करण्यात आलेल्या आरोपी आणि त्यांच्या साथीदारांविरोधात विविध राज्यात सात सायबर फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याचे तसेच या टोळीचा देशातील विविध राज्यात एकूण ११५ सायबर तक्रारींमध्ये सहभाग असल्याचे आढळून आले आहे. सायबर पोलिसांना टोळीच्या बँक खात्यातील तब्बल ३९.३५ लाखांची रक्कम गोठवण्यात यश आले आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये मोहिनीश देवेंद्र राजपाल (३६) आणि अंशुमन अरमान सिंह (२३) या दोघांचा समावेश असून दोघेही उत्तर प्रदेश राज्यातील आहेत. या आरोपींनी आणि त्यांच्या इतर साथीदारांनी महिला असल्याचे भासवून कळंबोलीतील ५९ वर्षीय व्यावसायिकासोबत मैत्री केली होती. त्यानंतर या टोळीने व्यावसायिकाला फॉरेक्स ट्रेडींग आणि क्रिप्टो ट्रेडींगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून जास्त फायदा मिळवण्याचे आमिष दाखविले तसेच डिसेंबर महिन्यात त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने पैसे भरण्यास सांगून त्यांच्याकडून तब्बल ६०.२३ लाख रुपये उकळले होते. त्यानंतर या टोळीने आपले सर्व मोबाईल नंबर बंद करुन व्यावसायिकाची फसवणूक केली होती.

या प्रकरणी नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी फसवणूक करण्यासाठी वापरलेले बँक खाते तसेच मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले. यामध्ये आरोपींचे वास्तव उत्तर प्रदेश लखनौ येथे असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर सायबर पोलिसांच्या पथकाने लखनौ येथे जाऊन आरोपींचा शोध घेतला असता, मोहिनीश देवेंद्र राजपाल नामक लॉज चालक पोलिसांच्या हाती लागला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने इतर साथिदारांसह हा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी अधिक तपास करून या प्रकरणातील दुसरा आरोपी बेकरीचालक अंशुमन अरमान सिंह याला अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपी आणि त्यांच्या साथिदारांविरुद्ध उत्तर प्रदेशमधील गौतम बुद्धनगर, आंध, प्रदेश श्रीकालहस्ती, राजस्थान जयपूर, झारखंड, पुणे हिंजवडी, हरियाणा फरिदाबाद येथील सायबर पोलीस ठाण्यांमध्ये सायबर फसवणुकीचे सात गुन्हे दाखल असल्याचे तपासात आढळून आले आहे. त्याचप्रमाणे या आरोपींचा महाराष्ट्राती नऊ तसेच विविध राज्यात एकूण ११५ सायबर फसवणुकीच्या तक्रारींमध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## ३९.३५ लाखांची रक्कम गोठवली

### तांत्रिक तपास, तत्काळ पत्रव्यवहार

फसवणूक झालेल्या व्यावसायिकाने ज्या बँक खात्यात रक्कम भरली होती, ते सर्व बँक खाते गोठविण्याबाबत सायबर पोलिसांनी तत्काळ पत्रव्यवहार केल्याने या बँक खात्यातील एकूण ३९.३५ लाखांची रक्कम गोठविण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे. गुन्ह्याचा तांत्रिक तपास नवी मुंबईच्या सायबर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक रोहित बंडगर, पोलीस शिपाई भाऊसाहेब फटांगरे, निरज दाभाडे, महिला पोलीस शिपाई पुनम गडगे, आदींच्या पथकाने केली.

# जेएनपीएची ॲडिशनल लिक्वीड कार्गो जेट्टी 'जेएसडब्ल्यू'ला देण्यास मंजुरी

**उरण : प्रतिनिधी**



जेएनपीएने नव्याने उभारलेल्या ३१४ खर्चाच्या ॲडिशनल लिक्वीड कार्गो जेट्टी सर्वाधिक यशस्वी ठरलेल्या जेएसडब्ल्यू इन्फ्रा स्ट्रक्चरल लिमिटेड कंपनीला देण्यावर मंगळवारी (दि.५) झालेल्या बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

जुन्या लिक्वीड कार्गो जेट्टीला जोडूनच अतिरिक्त आणखी जेट्टी ४६५ मीटरपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे ॲडिशनल लिक्वीड कार्गो जेट्टीमुळे केमिकल वाहतुकीची क्षमता आणखी ४.५ मेट्रिक टनांपर्यंत म्हणजेच ११ मिलियन टनांपर्यंत (एमटीपीए) म्हणजे दुपटीने वाढली आहे. त्यासाठी ३१४ कोटी रुपये खर्चही करण्यात आले आहेत. ही ॲडिशनल लिक्वीड कार्गो जेट्टी पीपीपी तत्त्वावर चालविण्यासाठी जेएनपीएने निविदा काढल्या होत्या. या निविदा प्रक्रियेत सात कंपन्या सहभागी झाल्या होत्या.

या सात कंपन्यांमध्ये जेएसडब्ल्यू इन्फ्रा स्ट्रक्चरल लिमिटेडची बोली सर्वात मोठ्या रॉयल्टी देणारी ठरल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली.

## थंडी पुन्हा वाढली!

**पनवेल :** थंडीच्या हंगामात ज्या प्रमाणात गारवा जाणवायला हवा होता त्याप्रमाणात जाणवला नाही, मात्र आता उन्हाळा ऋतू सुरू होण्याच्या सुरुवातीला थंडी पुन्हा जाणवत आहे. दिवसा कडक ऊन असले तरी रात्री आणि पहाटे गारवा वाढत आहे. त्यामुळे साथीच्या आजारांनी नागरिक हैराण झाले आहेत.

## कार अपघातात चार प्रवासी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या दिशेने जाताना हरिग्राम-वाघेऱ्याजवळील पुलाखाली चारचाकी कार कोसळल्याची घटना घडली. यात काही जण जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. फेब्रुवारी महिन्यात याच ब्रिजवरून एक कार खाली कोसळली होती. मार्च महिन्यातील ही दुसरी घटना घडली.

पनवेलच्या दिशेने एक चारचाकी कार जात होती. या वेळी ही नाकार ब्रिजवरून खाली कोसळली. या कारमध्ये चौघेजण असल्याची माहिती समोर आली आहे. यातील काही जण जखमी झाले असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

## तक्का येथील शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात



**पनवेल : वार्ताहर**

तक्का येथील श्री गुरू लिंगेश्वर पब्लिक एज्युकेशन सोसायटी मराठी प्रायमरी स्कूलचे स्नेहसंमेलन बुधवारी (दि.६) नवनाथ नगर वसाहत येथे झाले.

या कार्यक्रमाला भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहराध्यक्ष रावसाहेब खरात, रिपाईचे महेश साळुंखे, पं. स. गटशिक्षणाधिकारी सीताराम मोहिते, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राम तेकम, परहर हॉस्पिटलचे सिद्धेश परहर, पिपल फॉर अध्यक्ष श्याम बावीस्कर, सदस्य करण सिंगजी, भाजप शक्तीकेंद्र प्रमुख राजू बगाटे, सामाजिक कार्यकर्ते निलेश, संस्था प्रतिनिधी राजेश्वर बावणे, माजी मुख्याध्यापक पनवेल प्रदीप शिखरे, मुख्याध्यापक प्रवीण शिलवंत, ज्येष्ठ शिक्षिका अंकीता पिंगळे, सहशिक्षक देवव्रत चाफेसर, सुनील पाटील, सर्जेराव साळवे, किरण वाहुळकर, विजय झिरे, उमेश कांबळे, गणेश जाधव, राजू झिरे, हरीभाऊ घुले, चेतन सकपाळे, सागर जाधव, अजय पवार, सनी साळवे, प्रदिप जाधव, अनिकेत खरात उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे शिक्षक सुनील पाटील यांनी केले. मार्गदर्शन पिंगळे अंकीता मॅडम यांनी केले. सूत्रसंचालन संपूर्ण बकुळा चाफे यांनी केले.

## निवडक

### पनवेल शहरात आढळला मृतदेह

**पनवेल :** शहरातील पटवर्धन हॉस्पिटलसमोरील रोडवर एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पोलीस करीत आहेत. मृत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ ते ४०, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फुट सात इंच, डोक्याचे केस काळे पांढरे, खुरटी दाढी, त्याने लाल रंगाचा फुल बाह्याचा चौकडी शर्ट व सफेद चौकडी चेक्स रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७४५२३३३) किंवा सहा. पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा.

### श्रवण तपासणी व समुपदेशन शिबिर

**पनवेल :** नवजात बालकांना श्रवणविषयक विविध समस्यांना सामोरे जावे लागते आणि ज्यांचे वेळीच निदान न झाल्यास भविष्यात गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. डॉ राजेंद्र वाघेला (ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन, मेडिकवर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) आणि त्यांची टीम रविवारी (दि.१०) १० ते दुपारी २या वेळेत पाच वर्षाखालील मुलांचे मोफत श्रवण तपासणी आणि कॉक्लियर इम्प्लांट समुपदेशन करणार आहे. हे शिबिर खारघरमधील मेडीकवर हॉस्पिटल्स येथे होणार असून पुर्वनोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी सुरेंदर राव नैनवार (+९१८६५५८८०५५३), सुजय महाजनी (+९१८६५५६१७८४१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.



पनवेल : येथील रामदास (मारुती) मंदिराच्या १०७व्या प्रतिवार्षिक दासनवमी उत्सवाची समाप्ती वर्षा रानडे-सहस्रबुद्धे यांच्या कीर्तनाने झाली.




## संपादकीय

# मुक्ताफळांची किंमत

राहुल गांधी यांच्या वक्तव्यांमुळे अंतिमत: काँग्रेस पक्षाचेच अपरिमित नुकसान होते हे ना त्यांना कळते, ना त्यांच्या पक्षाला. विरोधी पक्षाच्या नेत्याने सत्ताधाऱ्यांना धारेवर धरायलाच हवे, किंबहुना ते त्याचे कर्तव्यच आहे, परंतु सत्ताधाऱ्यांना असलेला विरोध जेव्हा असंस्कृत लाखोलीच्या पातळीवर उतरतो तेव्हा प्रकरण गंभीर होऊन बसते. निवडणूक आयोगाने दिलेल्या कानपिचकीमुळे राहुल गांधी यांच्या वर्तणुकीत काही बदल घडेल अशी शक्यता नाही.

**निवडणुकीचे दिवस जसजसे तापत जातील तसतशी विविध पक्षांतल्या नेत्यांची वक्तव्ये सभ्यतेच्या आणि सुसंस्कृतपणाच्या सगळ्याच मर्यादा ओलांडून जाताना दिसतील. लोकशाही व्यवस्थेत असे घडू नये ही अपेक्षा असते, पण निवडणुकीचा कैफ एकदा चढला की तो लवकर उतरत नाही. त्यातच एखादा बोलभांड नेता प्रचाराच्या निमित्ताने गावगन्ना भाषणे देत सुटला की त्याला भान उरत नाही. काही नेते तर टीव्ही वाहिन्यांचे कॅमेरे बघून अक्षरश: चेकाळल्यासारखे बोलतात. याची महाराष्ट्रातदेखील पुष्कळ उदाहरणे आहेत. अनेक कानपिचक्या मिळूनही अशा नेत्यांच्या वर्तनात आणि वाणीमध्ये सुधारणा होत नाही. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी गेल्या नोव्हेंबरात जे तारे तोडले होते, त्याचा फटका त्यांना नुकताच बसला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बेलगाम टीका करताना त्यांचा तोल सुटला आणि त्यांनी 'पनौती' आणि 'जेबकतरा' (पाकिटमार) यांसारख्या विशेषणांचा वापर केला. आश्चर्याची बाब म्हणजे हे अपशब्द त्यांनी देशाच्या पंतप्रधानांविरुद्ध वापरले. अहमदाबाद येथे झालेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम लढतीत भारतीय संघाचा पराभव झाला, कारण नरेंद्र मोदी यांच्यासारखी 'पनौती' तेथे उपस्थित होती असे अत्यंत अश्लाघ्य आणि लाजिरवाणे उद्‌गार राहुल गांधी यांनी काढले. राजधानी दिल्लीत वर्षानुवर्षे सत्ता उपभोगणाऱ्या परिवारातील बिघडलेल्या कुलदीपकाचे हे वर्तन होते. या उद्‌गारांना किमान सभ्यतेचाही स्पर्श नव्हता. आपण कुणाबद्दल बोलत आहोत, काय बोलत आहोत याचे भान त्यांना उरले नाही. तसे ते कधी नव्हतेच. साहजिकच गांधी यांच्या खालच्या पातळीवरील उद्‌गारांमुळे देशभर संतापाची लाट उसळली होती. हे प्रकरण दिल्ली उच्च न्यायालयात गेले असता गांधी यांचे वक्तव्य हीन अभिरूचीचे आहे अशी टिप्पणी करीत न्यायालयाने आठ आठवड्यांच्या आत गांधी यांच्या विरोधात कारवाई करावी अशी सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाला केली. त्यानुसार आयोगाने बुधवारी खासदार गांधी यांना पत्र पाठवून सक्त ताकीद दिली. यापुढे भाषणे देताना दोनदा विचार करावा असा सल्लादेखील त्यांना या पत्राद्वारे देण्यात आला आहे. बेलगाम वक्तव्ये करण्याची गांधी यांची ही पहिलीच वेळ नव्हे. या आधीदेखील अनेकदा त्यांनी सभ्यतेच्या मर्यादा ओलांडल्या आहेत. २०१९ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी गांधी यांनी राफेल विमान खरेदीवरून पंतप्रधान मोदी यांच्यावर भलभलते आरोप केले होते. तेव्हाही त्यांना न्यायालयासमोर माफी मागावी लागली होती. गांधी यांना भारतीय जनतेने केव्हाच नाकारले आहे. आडनावाशिवाय त्यांच्याकडे काहीच उरलेले नाही. तरीही न्याययात्रेच्या नावाखाली पंतप्रधानांची निंदानालस्ती करीत ते फिरत आहेत. राहुल गांधी यांच्या वक्तव्यांचा फटका काँग्रेस पक्षाला आणि पर्यायाने तथाकथित इंडिया आघाडीला बसल्याशिवाय राहणार नाही. ही वक्तव्ये जितकी वाढतील, तितका लाभ भारतीय जनता पक्षाच्या पदरात पडेल हे सगळ्यांनीच लक्षात ठेवावे.**

# जागतिक महिला दिन विशेष 'ती'

'तिच्या' वाट्याला आलेले अर्धे आभाळ अजूनही काळवंडलेलेच आहे. हे मळभ हटवण्यासाठी तिचा निकराचा लढा सुरूच आहे. अनेक क्षेत्रात तळपती समशेर बनून ती आपल्या शत्रूंशी लढत आहे. हे शत्रू किती आहेत याची गिनती करणे सोपे आहे, पण ते कोण आहेत हे ओळखणे अवघड आहे. जगातल्या सर्वांत सुरक्षित जागेत म्हणजे आईच्या पोटात तिच्या गळला नख लावण्याचे दुष्टकार्य केले जाते तेही 'जन्मदात' आईबापाच्या संमतीने आणि आजी-आजोबा, आत्या, मामा यांच्या साक्षीने. कदाचित आईच्या मनाविरूद्ध ते घडत असेल. आपल्या गर्भाच्या मृत्यूबरोबर (की हत्या?) मातृप्रेमाच, वात्सल्याच्याही चिंधड्या उडवल्या जाताना तिला पाहावे लागते.

या जगात प्रवेश केल्यावरही 'भय इथले संपत नाही' अशी स्थिती असते. घरातल्या जवळच्या नातेवाईकापासून गावच्या गुंडापर्यंत कुणीही तिच्या 'वाटेवरच्या काचा' बनून तिची पावले रक्तबंबाळ करू शकतो. प्राणिजीवन टिपणाऱ्या टी.व्ही. वाहिनीवरील खूँखार श्वापदेही असे प्रसंग पाहून माना खाली घालतील. तिच्या आयष्यातल्या स्वप्न सोहळा म्हणजे लग्न असेल तर त्यानंतरही तिला 'त्याच्या' आई, बहिणीच्या रोषाला बळी पडावे लागते. त्यांची लालसा स्टोव्हच्या इंधनापेक्षा जास्त ज्वालाग्राही बनते व असे अनेक स्टोव्ह भडका उडवून तिच्या स्वप्नांची राख करतात. सासू नावाची स्त्री, सून नावाच्या स्त्रीचा इतका प्राणांतिक दुस्वास का करते, हे मानवजातीला आतापर्यंत न उलगडलेले कोडे आहे!

तिचा सर्वांत मोठा शत्रू म्हणजे पुरूषी मानसिकता. साबण, चारचाकी किंवा कोणतेही उत्पादन विकण्यासाठी जाहिरातीतले तिचे प्रदर्शन असो, मोबाईलवरून मोबाईलकडे फिरणाऱ्या ओंगळवाण्या, गलिच्छ चित्रफिती असोत, त्यातून तो पुरूषी अहंगंडच दिसून येतो. तो भाषेमध्येही कसा उतरला आहे, याचे उदाहरण नुकतेच ऐकावास मिळाले. गोट्यांच्या खेळात जी गोटी हरते व मार खाते तिला कन्नड भाषेत 'हेण्णु' (मुलगी) व जिंकलेला आणि मारणाऱ्या गोटीला 'गंडु' (मुलगा) म्हणतात.

अशा अनेक शत्रूंना रिचवत, पचवत 'ती' तिची लढाई लढत आहे. ती समाजाच्या नीतीमत्तेचा कणा आहे. बेहिशोबी संपत्ती गोळा करणाऱ्या नवऱ्याचा हात तिने थांबवला वा मुलींशी बेताल वर्तन करणाऱ्या आपल्या मुलाच्या श्रीमुखात भडकावली तर चित्र बदलण्यास वेळ लागणार नाही. निसर्गाने तिला 'प्रेम' नावाची विलक्षण देणगी दिली आहे. ते तिचे शस्त्र आहे. या शस्त्राने ती अनेक अवघड शल्यकर्मे सहजरित्या पार पाडते. तिच्या शब्दात मंत्राचे सामर्थ्य आहे. या मंत्राने ती अग्नी फुलवूही शकते व विझवूही शकते. त्या मंत्राचा ती कसा उपयोग करते, यावर समाजाचे अस्तित्व अवलंबून आहे.



तिच्या डोळ्यातल्या अंगाराला कायद्याचे कवच लाभले तर दुष्कर्मे करणारे क्रूरकर्मा निश्चितच पुढे येण्यास कचरतील. ज्ञानदेव म्हणतात की, 'स्त्री-पुरूषन्नामभेदे। शिवपण एकले नांदे।' म्हणजे शिवशक्तींचे स्वरूप वरून जरी दोन दिसत असले तरी त्यांचे तत्त्व एकच आहे. स्त्री-पुरूष समानता याच्यापेक्षा सोप्या व वेगळ्या शब्दात सांगता येणार नाही. अर्थात हा विचार समाजात रूजायला आणखी किती दिवस लागतील, हे सांगता येत नाही.

**...म्हणून साजरा केला जातो महिला दिन**

दरवर्षी जागतिक महिला दिन ८ मार्चला साजरा केला जातो. महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याबरोबरच त्यांची समाजातील ओळख अधोरेखीत करण्यासाठी महिला दिन जगभरात साजरा केला जातो. यादिवशी विविध कार्यक्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो. त्यांना सन्मानित केले जाते. इतर महिलांना त्यातून प्रेरणा मिळावी हा त्यामागचा हेतू असतो. महिलांना भेटवस्तू दिल्या जातात. पण हा दिवस साजरा करण्यामागचे मूळ कारण काय हे तुम्हांला माहित आहे का? त्यासाठी आपल्याला महिला दिनाचा इतिहास माहित असणे गरजेचे आहे.

जागतिक महिला दिन हा दिवस जागतिक स्तरावर दरवर्षी ८ मार्च रोजी महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीचा उत्सव साजरा करण्यासाठी साजरा केला जातो. तसेच, लिंग समानतेचे महत्व पटवून देण्यासाठीदेखील हा दिवस साजरा केला जातो.

जागतिक महिला दिन हा दिवस आज जरी समाजात महिलांचा सत्कार करून साजरा केला जात असला तरी, हा दिवस उजाडण्यामागे एक इतिहास आहे. हा इतिहास नेमका काय? महिला दिन का साजरा केला जातो आणि याचं महत्त्व काय ते समजून घेणं गरजेचे आहे.

संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ संपूर्ण जगभरातील स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या. १८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्कासंदर्भात ऋद नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन' स्थापन झाली. परंतु ही असोसिएशनसुद्धा वर्णद्वेषी आणि स्थलांतरितांविषयी पूर्वग्रह असणारी होती. ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात एकत्र येऊन प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता या मागण्या केल्या. या दोन मागण्यांबरोबरच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली. १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा ऋजागतिक महिला-दिन' म्हणून स्वीकारावा हा क्लारा यांनी मांडलेला ठराव पास झाला.

भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. ८ मार्च १९७१ ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे १९७५ हे वर्ष युनोने ऋजागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करताना दिसून येतो.

१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा यासाठी आवाहन केले. आणि त्यानुसार संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. २०२४ ची थीम दरवर्षी जागतिक महिला दिन विशेष थीमसह साजरा करण्याची परंपरा आहे. गेल्या वर्षी महिला दिनाची थीम "EmbraceEquity' या संकल्पनेवर आधारित होती. यंदा महिला दिनाची थीम 'इंस्पायर इंक्लूजन' ही आहे.






**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

### मस्तच! व्हॉट्सॲपवर जुने मेसेज शोधण्यासाठी फीचर

व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर आणण्याची घोषणा केली आहे. ज्याच्या माध्यमातून तुम्ही एखाद्या विशिष्ट तारखेला पाठवलेले मेसेज, फोटो किंवा व्हिडीओ ॲण्ड्रॉइड फोनवर किंवा चॅटमध्ये सहज शोधू शकाल. हे फीचर आयओएस, मॅक आणि व्हॉट्सॲप वेबवर आधीच उपलब्ध होतं. या फीचरची घोषणा फेसबुकची मूळ कंपनी मेटाचे फाउंडर आणि सीईओ मार्क झुकेरबर्ग यांनी त्यांच्या व्हॉट्सॲप चॅनलवर केली आहे.



मार्क झुकेरबर्गने सांगितलं की, आता व्हॉट्सॲपवर तुम्हाला कोणत्याही जुन्या चॅटमध्ये पाठवलेले मेसेज सहज सापडतील. स्वतः एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये हे दाखवण्यात आलं आहे. हे नवीन फीचर खूप उपयुक्त असल्याचंदेखील सांगितलं आहे.

व्हॉट्सॲपच्या या नवीन फीचरमध्ये तुम्ही फक्त एक तारीख निवडून त्या दिवसाच्या चॅट्स शोधू शकता. कंपनीचे म्हणणे आहे की, 'जुने इंटरेस्टिंग मेसेज शोधण्यासाठी किंवा एखाद्याला पाठवलेली माहिती पुन्हा तपासण्यासाठी हे फीचर खूप उपयुक्त ठरेल. यामुळे चॅट शोधणं सोपं होईल.


**कसं वापरायचं?**

*** ग्रुप आणि चॅट ओपन करा.**
*** वर असलेल्या सर्च आयकॉनवर टॅप करा.**
*** तुम्हाला तेथे कॅलेंडर आयकॉनदेखील दिसेल.**
*** कॅलेंडर आयकॉनवर टॅप करून तुम्ही तुम्हाला हवी असलेली तारीख निवडा.**
*** तुम्हाला निवडलेल्या तारखेचे सर्व मेसेज दिसतील.**

व्हॉट्सॲपने म्हटलं आहे की या फीचरचा वापर करून तुम्ही चॅटमध्ये उपस्थित मीडिया (जसे फोटो, व्हिडीओ), लिंक्स आणि डॉक्युमेंट्सदेखील शोधू शकता.

गेल्या काही महिन्यांपासून मेटा कंपनीने व्हॉट्सॲपचे बरीच वेगवेगळी फीचर्स वापरकर्त्यांसाठी लाँच केली आहेत. त्यामुळे वापरकर्त्यांना सुरक्षित पद्धतीने ॲप वापरण्यास मदत होऊन व्हॉट्सॲप वापरण्याचा अनुभव सुधारण्याच्या दृष्टीने हे बदल केलेले आहेत. कंपनी व्हॉट्सॲप यूजर्ससाठी नवनवीन फिचर्स देत असते. त्यामुळे या सेवेचा आनंद अधिक मिळतो.

# कवी, कथा-कादंबरीकार चिं. त्र्यं. खानोलकर



**निमित्त**

विचारपूर्वक, अभ्यासपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक लेखन करणारे कवी/लेखक अनेक असतात. आपापल्या परीने ते मोठेही असतात, पण 'प्रतिभा' ही निसर्गदत्त/ईश्वरदत्त देणगी असते, असे म्हणायला लावणारे काही मोजकेच कवी/लेखक असतात. आरती प्रभू (चिंतामणी त्र्यंबक खानोलकर) हे अशा मोजक्या साहित्यिकांपैकी एक. 'मी मातीचे ऋण फेडाया देवाघरून आलो' असे त्यांनी आपल्या एका कवितेत म्हटले आहे आणि त्यांचे लेखनकर्तृत्व पाहता या ओळीची सत्यता प्रतीत होते.


खानोलकर यांचा जन्म बागलांची राई, तेंडोली (ता.वेंगुर्ले, जि.सिंधुदुर्ग) येथे झाला. त्र्यंबक विश्राम प्रभुखानोलकर आणि सुंदराबाई या दाम्पत्याचे हे सहावे अपत्य होते. बागलांची राई येथे चिदानंद स्वामींचा मठ आहे. आपल्याला लाभलेले प्रतिभेचे देणे हा चिदानंद स्वामींचा कृपाप्रसाद आहे, असे खानोलकर मानीत असत. नवीन लेखनाला प्रारंभ करण्यापूर्वी 'श्री चिदानंद स्वामी प्रसन्न' असे ते लिहीत असत. त्यांच्या लेखनात हा मठ आणि त्याचा परिसर याचे चित्रण विविध स्वरूपांमध्ये आलेले आहे.

तेंडोली, वेंगुर्ले, सावंतवाडी, मुंबई, कुडाळ अशा अनेक ठिकाणी स्थलांतर होत-होत खानोलकरांचे बालपण व्यतीत झाले. कुडाळ हायस्कूलच्या 'बालार्क' या वार्षिकांकात खानोलकारांची 'भवितव्य' ही कविता व 'मोगऱ्याची वेणी' ही कथा प्रसिद्ध झाली. यानंतर वर्षभरातच १९५१मध्ये त्यांची 'जाणीव' ही कथा सत्यकथेत प्रसिद्ध झाली. सावंतवाडीतील 'वैनतेय' या साप्ताहिकातून त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या असल्या तरी सत्यकथेत कविता प्रसिद्ध होण्यास काहीसा विलंब झाला. 'आरती प्रभू' या टोपणनावाने पाठविलेली त्यांची 'शून्य शृंगारते' ही कविता १९५४मध्ये प्रसिद्ध झाली. या स्त्रीनामसदृश टोपणनावाचे कुतूहलही काही काळ साहित्यविश्वात होते, मात्र लवकरच सर्वांना योग्य तो खुलासा झाला. कवितालेखनासाठी 'आरती प्रभू' हे टोपणनाव मात्र कायम राहिले.

खानोलकरांनी किशोरवयापासून साहित्यप्रेम जपले आणि या साहित्यप्रेमाने त्यांची संगत अखेरच्या दिवसापर्यंत सोडली नाही. मृत्यूपूर्वी आठवडाभर ते काही काळ शुद्धीवर आले असता त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉ.देवल यांच्या आग्रहाखातर त्यांनी 'अखेरच्या वळणावर यावा। मंद सुगंधी असा फुलोरा। थकले पाऊल सहज उठावे। आणि सरावा प्रवास सारा' ही आपली अखेरची कविता म्हटली. त्यांचा प्रत्येक श्वास जणू साहित्याशी जोडला गेला होता. आरती प्रभूंच्या स्मरणार्थ सावंतवाडीच्या चिंतामणी साहित्य सहयोग या संस्थेने 'आरती' या नावाचे वाङ्मयीन मासिक सुरू केले. पंचवीसहून अधिक वर्षे हे मासिक प्रसिद्ध होत आहे. कुडाळ येथे कुडाळ हायस्कूलच्या रंगमंचाला आरती प्रभूंचे नाव दिलेले आहे. तेथे नाट्यविषयक अनेक उपक्रम चालतात. आरती प्रभूंची समग्र वाङ्मयसूची जया दडकर यांच्या 'चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात' या पुस्तकात समाविष्ट आहे.

**-डॉ. विद्याधर करंदीकर**

**क्लिक...क्लिक...!**



**रसायनी : आपटा गावातील जंगलात गुरुवारी वणवा लागला होता. खरेतर वणवा लागावा एवढे हे घनदाट जंगल नाही. त्यामुळे याबाबत वनखात्याने लक्ष घातले पाहिजे आणि ही बाब गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)

## आरोग्य प्रहर

### महिलांनो चाळीशी पार झाली असेल तर या तपासण्या करा

रोजच्या दैनंदिन रहाटगाडीतून दिवस ढकलताना महिलांच्या वयोमानानुसार हळूहळू आरोग्याच्या तक्रारी सुरू होतात. चाळीशी पार झालेल्या महिलांनी आरोग्याच्या लहानसहान तक्रारींकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात जीवघेणा आजार बळावण्याची भीती असते. याबाबत डॉ. अजय शाह यांना सविस्तर माहिती दिलीये.



**मॅमोग्राफी :** महिलांमध्ये स्तन कर्करोगाचे प्रमाण वाढत चालले आहे. वाढत्या कर्करोगाच्या रुग्णांची संख्या लक्षात घेता स्तन कर्करोगाचे वेळीच निदान होण्याच्या हेतूखातर मॅमोग्राफी चाचणी फार महत्त्वाची ठरते. महिलांच्या स्तनांमधील पेशींमध्ये ट्यूमर ओळखण्यासाठी मॅमोग्राफी चाचणी म्हणजेच स्तनांचे स्क्रीनिंग केले जाते. कर्करोगतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार महिलांनी दोन किंवा वर्षातून एकदा मॅमोग्राफी तपासणी जरूर करावी.

**पॅप स्पिअर आणि एचपीव्ही तपासणी :** गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे निदान होण्यासाठी पॅप स्पिअर आणि ह्यूमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) या दोन चाचण्या महत्त्वाच्या असतात. महिलांचे रजोनिवृत्तीचे वय झाल्यावर दोनपैकी केवळ एचपीव्ही तपासणी कर्करोगतज्ज्ञांकडून सूचवली जाते. या तपासणीतून गर्भाशयाचा कर्करोग प्राथमिक अवस्थेत असला तरीही अचूक माहिती मिळते. परिणामी वेळीच संबंधित महिला रुग्णांवर उपचार सुरू करता येतात.

**हाडांची कार्यक्षमता जाणून घेणारी चाचणी :** वाढत्या वयासह माणसाच्या शरीरातील हाडे ठिसूळ होत जातात. कालांतराने रुग्णाला 'ओस्टेओस्पॉरॉयसिस' (हाडांचा ठिसूळपणा) हा आजार होतो. महिलांमध्ये रजोनिवृत्तीच्या काळात 'ओस्टेओस्पॉरॉयसिस' आजार हमखास पाहायला मिळतो. या आजाराचे वेळीच निदान होण्यासाठी महिलांनी हाडांची कार्यक्षमता जाणून घेणारी चाचणी जरूर करावी. डेक्सा स्कॅन तपासणी करून शरीरातील हाडांची कार्यक्षमता जाणून घेता येते.

**रक्तदाब तपासणी आणि लिपिड प्रोफाईल चाचणी :** रजोनिवृत्तीच्या काळानंतर महिलांमध्ये हृदयरोगाचाही धोका संभवतो. रक्तातील कॉलेस्ट्रॉलसारख्या चरबीला किंवा फॅटला इंग्रजीत लिपिड असे संबोधले जाते. हृदयरोगासारख्या घातक आजारापासून बचाव करण्यासाठी महिलांनी ठराविक अंतराने रक्तदाब तपासणी, शरीरातील वाढत्या चरबीवर नियंत्रण राहण्यासाठी लिपिड प्रोफाईल चाचणीही करावी.

**थायरॉईड कार्यक्षमता चाचणी :** वाढत्या वयानुसार महिलांना थायरॉईडशी संबंधित 'हायपरथायरॉईडीजम' आजार होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे थायरॉईड कार्यक्षमता चाचणी करावी.

# खोपोली सुधारित विकास आराखडा बैठकीत गदारोळ

## निर्णयाविना बैठक गुंडाळली

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील नगर परिषदेच्या प्रारूप सुधारित विकास योजना आराखडा बैठकीत उपस्थित नागरिकांनी प्रश्नांची सरबत्ती केल्याने प्रचंड गोंधळ माजला. अखेर मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांना हस्तक्षेप करीत बैठक तहकूब करावी लागली. त्यांनी प्रत्येक प्रभागात जाऊन स्थानिकांच्या तक्रारी ऐकून घेण्यात येतील, असे सांगितल्यानंतर सभागृह शांत झाले.

खोपोली नगर परिषदेच्या कौन्सिल हॉलमध्ये प्रारूप सुधारित विकास योजना आराखडा बैठकीचे आयोजन गुरुवारी (दि.७) करण्यात आले होते. या बैठकीला अलिबाग कार्यालयातील नगररचना अधिकारी गुंडाप्पा थोंटे उपस्थित होते. मुख्याधिकारी बैठकीची माहिती देत असताना एकाच वेळी अनेक जण बोलावयास उठल्याने बैठकीत गदारोळ माजला. माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांनी अनेक तांत्रिक बाबी समोर आणून प्रशासनावर शीरसंधान साधले. निवृत्त अभियंता अशोक पाटील यांनीही शहराच्या विकासाबाबतच्या अनेक बाबी समोर आणल्या. लवजी व चिंचवली या भागाचा विकास गेल्या ४० वर्षांत झाला नसल्याच्या तक्रार समीर शिंदे, सुदेश थरकूडे, किशोर पाटील, अरुण पाटील यांनी केली, तर चिंचवलीचे रवी रोकडे यांनी गेल्या ४० वर्षात जमिनी आरक्षित केल्या आहेत त्याचा मोबदला तरी द्यावा, अन्यथा त्या जागा शेतकऱ्यांना परत द्याव्या, अशी मागणी केली. अनेक भागातील डीपी अचानक बदलण्यात आल्याचा मुद्दा काहींनी उपस्थित केला.

या चर्चेत उद्योजक यशवंत साबळे, संदीप पाटील, अमोल जाधव, ॲड. रामदास पाटील यांसह अनेकांनी मुद्दे उपस्थित केले. बैठकीत होणारा प्रश्नांच्या भडीमार पाहता प्रशासनाला बैठक गुंडाळावी लागली. प्रत्येक प्रभागात जाऊन नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यात येतील, असे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सांगितले. त्यानंतर सभागृह शांत झाले.



# चोळई पूल आणि पोलादपूर विश्रामगृहाचे ऑनलाईन भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे नवी मुंबई येथील कोकण भवन येथे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि रायगडचे पालकमंत्री उदय सामंत पोलादपूर विश्रामगृहाच्या बांधकामासह तीन पुलांच्या कामांचे भूमिपूजन आणि चोळई नदीवरील पुलाचे बांधकामाचे उद्घाटन ऑनलाईन करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यामध्ये भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, डेप्युटी इंजिनियर अमृत पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे लाईव्ह आयोजन केले.

या वेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख निलेश अहिरे, पोलादपूरच्या नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, नगरसेवक मनोज प्रजापती व विनायक दिक्षित, शहरप्रमुख सुरेश पवार, भाजपच्या महिला अध्यक्षा उज्वला शेठ, शहर अध्यक्ष राजाभाऊ दिक्षित, नगरपंचायतीच्या सभापती अंकिता निकम, पदाधिकारी उपस्थित होते.



# महिला दिनी गड किल्ल्यांवर शुल्कमाफ

**मुरूड** : महिला दिनाचे औचित्य साधून राज्यातील गड किल्ल्यांवर (दि.८) पुरातत्व विभागातर्फे आकारले जाणारे प्रवेश शुल्क महिला सन्मानार्थ आबालवृद्धांना पूर्णतः माफ असणार आहे, अशी माहिती अलिबाग पुरातत्व विभाग सहाय्यक संवर्धक बी. जी. येलीकर यांनी दिली.

किल्ले रायगड, कुलाबा आणि मुरूड जंजिरा या किल्ल्यांवर गतवर्षी केवळ महिलांनाच प्रवेश शुल्क आकारले गेले नव्हते, परंतु या वर्षी महिलांसह पुरुषांनाही ही सवलत दिली जाणार असल्याचे सांगितले.


## उरण नगरपरिषद

### निविदा सूचना

उरण नगर परिषद खाली नमुद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदाराकडून मोहरबंद निविदा दरपत्रके मागवित आहे. निविदा /दरपत्रक दिनांक १७/३/२४ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद उरण यांचे नावे दाखल करणेच्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | सर्वोदयवाडी पंप हाऊस येथे नविन ५० एच.पी. मोनोब्लॉक / कपल टाईप सेंन्ट्रीफ्युगल मोटार पंप व त्यास लागणारे नविन साहित्य पुरविणे. | ५०००/- | २,०००/- |

अटी/शर्ती :-

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक ८/०३/२०२४ ते दिनांक १६/०३/२०२४ रोजी पर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक ८/०३/२०२४ ते दिनांक १६/०३/२०२४ रोजीचे सायं. ५.०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोन लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक १७/०३/२०२४ रोजीचे दुपारी ४.०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/ नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

जा.क्र. उनप/आरोग्य/३०५४/२०२३-२४
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : ०८/०३/२०२४

सही/-
(समीर जाधव)
मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण



## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### जाहिर ई-निविदा

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/५०२४/प्र.क्र. ०२/११४६/२०२४ दिनांकः ७/३ /२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Centeral Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी- २ शतमान पद्धतीनुसार जाहिर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/325/ 2023-24 | **पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर येथील सेक्टर १२, भुखंड क्र. १२ अ, क्षेत्र १४९१.०४ चौ.मी. या ठिकाणी दैनिक बाजार - मच्छी मार्केटचे बांधकाम करणे.** | ४,९०,९२,९८०/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. ११/०३/२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ.प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त- I
पनवेल महानगरपालिका

जा.क्र पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२००/२००/२०२४



## पनवेल महानगरपालिका
### ई-निविदा नोटीस

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. कोरा निविदा फॉर्म https:// mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०८/०३/२०२४ ते दि. १५/०३/२०२४ पर्यंत दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा दि. ०८/०३/२०२४ ते दि. १५/०३/२०२४ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन कार्यप्रणाली व्दारे स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाई करणे. | ०२ वर्ष | रु.३,५५,०००/- | रु.२,०००/-+५% GST |

दिनांक : ७/०३/२०२४
जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२०१/२०१/२०२४

सही/-
अतिरिक्त आयुक्त,
पनवेल महानगरपालिका



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-1/24-25 7000030357 | Providing outsourcing services of 6 Nos. skilled labour as LDC cum computer operator and 4Nos unskilled labour as a Peon at EHV (O&M) Circle, Panvel for F.Y. 2024-2025. Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs. 31.90 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 07.03.2024 at 12:00 Hrs to 14.03.2024 up to 23:59 hrs, Opening date:- 15.03.2024 @ 10:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8530095666 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



## ग्रुप ग्रामपंचायत आसरे,ता.खालापूर,जि.रायगड
### निविदा सुचना

**ग्रुप ग्रामपंचायत आसरे करिता १५ वा वित्त आयोग योजना सन :- २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या निधीमधून खालील कामे करणे करिता नोंदणीकृत जि.एस.टी ठेकेदार,धारकाकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या सिलबंद निविदा दि.०८/०३/२०२४ ते १२/०३/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.**

| अ.क्र | कामाचे नाव / वस्तूचे नाव | निधी स्त्रोत | अंदाजपत्रक रक्कम | वर्ष | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करणेची | | | १ टक्का इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | | |
| १) | यशवंत डुकरे ते अनिल डुकरे यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे. | १५ वा वित्त आयोग | ८००००/- | २०२१-२०२२ | ३महिने | १२/०३/२०२४ | सकाळी १० ते ०५.०० सायकाळी | ग्रा.पं.का.आसरे | ८०० | १००/- |
| २) | आसरे आदिवासीवाडी मुख्यरस्तापासून ते गणपती मंदिरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे. | १५ वा वित्त आयोग | १६३८६९/- | २०२१-२०२२ | ३महिने | १२/०३/२०२४ | सकाळी १० ते ०५.०० सायकाळी | ग्रा.पं.का.आसरे | १६३८ | १००/- |
| ३) | धारणी अंगणवाडी केंद्र येथे पाण्याची टाकी बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २०२२-२०२३ | ३महिने | १२/०३/२०२४ | सकाळी १० ते ०५.०० सायकाळी | ग्रा.पं.का.आसरे | २५० | १००/- |
| ४) | धारणी आदिवासीवाडी येथे बोरवेल मारून सौरसंच बसविणे व सिंटेक्स टाकी खरेदी करून चबुतरा बांधणे. | १५ वा वित्त आयोग | २५६०२०/- | २०२२-२०२३ | ३महिने | १२/०३/२०२४ | सकाळी १० ते ०५.०० सायकाळी | ग्रा.पं.का.आसरे | २५६० | १००/- |
| ५) | आसरे येथील विहिरीकडे जाणारा साकव (पुळ) तयार करणे. | १५ वा वित्त आयोग | ४००००/- | २०२२-२०२३ | ३महिने | १२/०३/२०२४ | सकाळी १० ते ०५.०० सायकाळी | ग्रा.पं.का.आसरे | ४०० | १००/- |
| ६) | रा.जि.प.शाळा आसरेवाडी रंगरंगोटी करणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | २०२२-२०२३ | ३महिने | १२/०३/२०२४ | सकाळी १० ते ०५.०० सायकाळी | ग्रा.पं.का.आसरे | ५०० | १००/- |

**अटी व शर्ती :-**

१. प्राप्त निविदा दि.१३/०३/२०२४ रोजी ठिक ११.०० वाजता ग्रा. पं. का. आसरे येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
२. निविदा भरणारे ठेकेदार हे नोंदणीकृत जी.एस.टी धारक असावेत.
३. कोणते हि एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच आसरे यांनी राखून ठेवला आहे.
४. प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा.उपअभियंता साहेब बांधकाम उपविभाग कर्जत यांचे कडील तांत्रिक अधिकारी व पं.स.खालापूर बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधान कारक नसले तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे.
५. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
६. ग्रामपंचायतीकडे रक्कम उपलब्ध झालेनंतर ठेकेदाराला रक्कम अदा केली जाईल.

श्री.संतोष धर्मा पवार
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत आसरे
ता.खालापूर,जि. रायगड

ग्रामपंचायत सील

श्री.बळीराम दिनकर जांभळे
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत आसरे
ता.खालापूर, जि.रायगड


# महिला दिनानिमित्त सन्मान सोहळा

**माणगाव** : माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान शुक्रवारी (दि.८) करण्यात येणार आहे.

या वेळी सभापती शर्मिला सुर्वे, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील, एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण सोनाली तेटगुरे, परिचारिका शिवकांती गवळी, डॉ. केतकी क्षीरसागर, शर्मिला सत्वे, नगरसेविका ममता थोरे, यशोधरा गोडबोले, स्वप्ना साळुंके, विनया जाधव, विनया ढेपे, अपूर्वा जंगम, कल्पना पाखुर्डे, दीप्ती मोरे आदींचा सन्मान होणार आहे.


ॲड. जी. आर. कडव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज नं. ३०५/२०२४
नि. ०७/ड
ने.ता. ३०/०४/२०२४

१. श्री केशव रघुनाथ नरसाळे
वय ८३ वर्षे धंदा - शेती
रा. ००२: दुसरा मजला, प्लॉट नं. १४८५, सिता निवास, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल ता पनवेल
२ कै. सुरेश रघुनाथ नरसाळे याचे वारस
२/१ श्री. प्रशांत सुरेश नरसाळे
वय ५३ वर्ष धंदा नोकरी रुम नं. २. पहिला मजला, सितांमाई अपार्टमेंट, लाईन आळी, पनवेल ता. पनवेल जि. रायगड
२/२ श्री. नरेंद्र सुरेश नरसाळे
वय ५५ वर्ष, धंदा नोकरी फ्लॅट नं. ४. पहिला मजला, यशस्वी अपार्टमेंट, शिवाजी रोड, मारुती मंदीरामागे, लाईन आळी, पनवेल ता. पनवेल जि. रायगड
२/३. श्री. विजय सुरेश नरसाळे
वय ४८ वर्षे, धंदा - नोकरी फ्लॅट नं. ४, पहिला मजला, यशस्वी अपार्टमेंट, शिवाजी रोड, मारुती मंदीरामागे, लाईन आळी, पनवेल ता. पनवेल जि. रायगड
३. कै. अशोक रघुनाथ नरसाळे यांचे वारस
३/१. श्रीमती भानुमती अशोक नरसाळे
वय - ४५ वर्षे, धंदा - गृहिणी रा. ६२६, बाजारपेठ, आपटा, ता. पनवेल जि. रायगड
३/२. श्री. अचिस अशोक नरसाळे
वय - ५० वर्षे, धंदा - नोकरी
रा. घर नं. ३२५०, खालची आळी, दत्त मंदीरजवळ, रत्नागिरी,जि. रत्नागिरी
३/३. श्री. अभय अशोक नरसाळे
वय ४६ वर्षे, धंदा - नोकरी
रा. ६२६, बाजारपेठ, आपटा, ता. पनवेल जि. रायगड
४. कै. वसंत रघुनाथ नरसाळे यांचे वारस -
४/१. श्री. अजय वसंत नरसाळे
वय - ५७ वर्षे, धंदा - नोकरी
रा. १०१, तेजश्री अपार्टमेंट, प्लॉट नं. १४०/९, लाईन आळी, पनवेल ता. पनवेल जि. रायगड
४/२. कै. प्रदिप वसंत नरसाळे यांचे वारस -
४/२/१. श्रीमती निता प्रदिप नरसाळे
वय - ६२ वर्षे, धंदा - गृहिणी
४/२/२. गौरी प्रदिप नरसाळे
वय - ३५ वर्षे, धंदा- नोकरी
४/२/३. श्री. अक्षय प्रदिप नरसाळे
वय ३० वर्षे, धंदा - नोकरी
अर्जदार नं. ४/२/२ व ४/२/३ तर्फे अखत्यारी अर्जदार नं. ४/२/१
अर्जदार नं. ४/२/१ ते ४/२/३ सर्व रा. ८०३, बालाजी आगन को.ऑप. हौ.सो. प्लॉट नं. ३११, ३६६ ते ३७० ओरियन मॉलच्या मागे, पनवेल ता. पनवेल जि. रायगड
४/३. श्रीमती वृषाली रमाकांत चव्हाण
वय - ६४ वर्षे, धंदा - गृहिणी
रा. ००१, श्री. विघ्नेष्वर सो. प्लॉट नं. १२३/१२४, से.९, नवीन पनवेल ता. पनवेल जि. रायगड
४/४. श्रीमती स्वाती सुनिल सावंत
वय ६० वर्षे, धंदा - गृहिणी रा. बी/४, सनराईज को.ऑप. हौ.सो.लि. नाडकर्णी हॉस्पीटलजवळ, पनवेल ता. पनवेल जि. रायगड
४/५. श्रीमती प्राची प्रमोद परब वय - ५६ वर्षे, धंदा - गृहिणी रा. बी.एम.सी. कॉलनी ०५, अब्दुल हमीद रोड, मालवणी गेट ०६, मालाड वेस्ट मुंबई.
४/६. श्रीमती प्रियंका प्रवीण साटम
वय - ५६ वर्षे, धंदा - गृहिणी रा. प्रगती निवास, प्लॉट नं. १९, विजय मार्ग, से. १९, नवीन पनवेल ता. पनवेल जि. रायगड
५. श्रीमती सुमन बापू कदम
वय ७२ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. फ्लॅट नं. सी ८/४३, मोझे हायस्कूलजवळ, त्रिदल नगर हौसींग बोर्ड कॉलनी, येरवडा, पुणे.
— अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीणीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ५ यांची आई कै. भिमाबाई उर्फ व्दारकाबाई रघुनाथ नरसाळे या ता. १८/३/१९८१ रोजी ०२. सिता निवास, लाईन आळी, शिवाजी रोड, पनवेल, ता. पनवेल येथे निधन झाल्या असून त्यांचे पती कै. रघुनाथ बाळकृष्ण नरसाळे हे देखील ता. ११/६/१९८६ रोजी लाईन आळी, पनवेल, ता. पनवेल येथे निधन झाले असून त्यांना अर्जदार १ ते ५ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांना सदरचा वारसदाखला शासकीय किंवा निम शासकीय कामाकरिता गरजेचा असल्याने अर्जदारांनी या न्यायालयांत अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्यापुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. आज ता.०७/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क. लिपिक**
**दि.न्या.क स्तर पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायाधिश क स्तर पनवेल**

# कमर्शियल पायलट प्राप्ती ठाकूर

रायगड जिल्ह्यातील आगरी समाजातील पहिली महिला पायलट होण्याचा मान माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पुतणी प्राप्ती राज ठाकूर यांनी वयाच्या २२व्या वर्षी मिळविला आहे.

प्राप्ती ठाकूर कमर्शियल पायलट झाल्या आहेत. उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील आणि सध्या नेरूळ (नवी मुंबई) येथे वास्तवव्यास असलेल्या प्राप्ती ठाकूर यांनी २०१९मध्ये बारामती येथील कार्व्हर एव्हिएशन अकॅडमीमध्ये ॲडमिशन घेतले. २०२०पासून त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. २०२४मध्ये प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर कमर्शियल पायलट (कॅप्टन) म्हणून त्यांना पदवी प्राप्त झाली. त्यांना एकूण २०७ तास उड्डाण असून यात पायलट इन कमांड तास १०० असणार आहेत. त्यांनी प्रशिक्षणाच्या वेळी सोलो उड्डाण बारामती ते लातूर ६०० किमी, लातूर ते कराड, कराड ते बारामती हे ६००० फूट उंचीवरून केले.



कमर्शियल पायलट म्हणजे जो सर्व प्रकारचे एअरक्राफ्ट पॅसेंजर जेट, कार्गो, चार्टर्ड विमान उडवतो. या पायलटच्या खांद्यावर हजारो प्रवाशांची जबाबदारी असते. कमर्शियल पायलट इंडिगो, एअर इंडिया यांसारख्या कंपनीमध्ये जॉब मिळवू शकतो.

प्राप्ती ठाकूर यांनी आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर (काका), भरत ठाकूर व रजनी ठाकूर (आई-वडील), माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत (आत्या), दीपक ठाकूर व योगिता ठाकूर (सासू सासरे), आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रतिक ठाकूर, स्वप्नील ठाकूर (सर्व भाऊ), राज ठाकूर (पती), मानस ठाकूर (दीर) आदींसह मित्रपरिवाराला दिले आहे. भविषयात देशाची सेवा करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

**-नितीन देशमुख, पनवेल**





# शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तिमत्व मुख्याध्यापिका राज अलोनी

एक कर्तबगार, कर्तव्यदक्ष, निर्णयक्षम, धडाडीचे, बुद्धिमान, आणि कमालीची स्मरणशक्ती ही सगळी विशेषणे ज्या महिला व्यक्तिमत्त्वाला साजेशी आहेत त्या म्हणजे मुख्याध्यापिका राज अलोनी मॅडम. जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघरच्या मुख्याध्यापिका राज अलोनी या खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्षेत्राला योग्य दिशा दाखवणाऱ्या, शिक्षणाला आधुनिकतेची जोड देणारे नेतृत्व ठरल्या आहेत.

राज अलोनी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या वतीने सन २०१०मध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची धुरा सांभाळली. सन २००९मध्ये १४८ विद्यार्थी आणि आठ वर्ग तुकड्यांनी या शाळेची वाटचाल सुरू झाली. मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी आपल्या उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्यद्वारे, सर्व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने या संस्थेचे रूपांतर एका प्रचंड वटवृक्षात केले आहे. आज २०२४ मध्ये ४२४९ विद्यार्थी आणि १०९ वर्ग तुकड्यांसह एक नामांकित शाळा बनविणाऱ्या त्या शिल्पकार ठरल्या आहेत. त्यांचे कामातील सातत्य, कर्मचारी सदस्यांना सोबत घेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला एका वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी असलेली तळमळ खऱ्या अर्थाने प्रेरित करते.

राज अलोनी, शैक्षणिक क्षेत्रात सर्व आधुनिक संकल्पना रुजवणारे व्यक्तिमत्व आहेत. सन २००५-२००६मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री वसंतराव पुरके यांच्या हस्ते त्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. दि मुस्लिम कौन्सिल ऑफ इंडियातर्फे सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार-२००२ त्यांना प्रदान करण्यात आला. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली २०२१च्या राष्ट्रीय स्वच्छ शाळा पुरस्काराच्या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने देशातील स्वच्छ विद्यालय होण्याचा बहुमान पटकावला, तसेच ब्रिटिश कौन्सिलचा आयएसए अवॉर्डदेखील विद्यालयाला मिळाला. नुकत्याच पार पडलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४ ही स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रभरातील शाळांसाठी आयोजित केली गेली. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने मुंबई विभागातून प्रथम क्रमांक पटकावून २१ लाखांचे बक्षीस जिंकले.



आज रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल एक 'मॉडेल' स्कूल म्हणून नावारूपास आले आहे. कोरोनासारख्या महामारीमध्ये देखील संपूर्ण टाळेबंदी असताना मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी ऑनलाईन ॲप प्रणालीचा वापर करून सर्व शिक्षकांना प्रशिक्षित करून, ऑनलाईन शिक्षणाची यशस्वी अंमलबजावणी केली. शाळा आणि शिक्षकांना ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहचवणारे नवी मुंबईतील हे पहिले वहिले स्कूल ठरले. राज अलोनी या दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी करियर समुपदेशन, व्यावसायिक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करतात, तसेच शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा आजदेखील कायम आहे. या विद्यालयातील कितीतरी विद्यार्थी आयआयटी मुंबई ते कार्नेगी मेलॉन, आयव्ही लीग स्कूल, यूएसए या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. आमच्या जीवनातील एक सगळ्यात प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहतो.

**-सुजाता जाधव, योगेश पाटील, आरटीपीएस शिक्षक**

# वनवासी कल्याण आश्रमच्या सुचेता जोशी

सुचेता धनंजय जोशी या मोहोपाडा परिसरातील. काही वर्षांपूर्वी त्यांनी अप्पा कारखानीस यांचे भारत आणि वनवासी क्षेत्र त्यातील समस्या, शिक्षण, आरोग्य, रोजगार यांचा अभाव याबाबतचे भाषण ऐकून त्या प्रभावित झाल्या आणि वनवासी कल्याण आश्रम या संस्थेबरोबर त्यांनी काम करण्यास सुरुवात केली.

सुचेता जोशी यांच्या घराजवळील वाडीतील अनेक मुले आजही शाळा जवळ असूनही शिक्षण घेत नसल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यांनी तातडीने वाडीवर जात पालकांचे समुपदेशन केले. एप्रिल आणि मे दोन महिने वाडीत वर्ग घेतले. त्यानंतर जूनमध्ये मुलांना शाळेत दाखल केले. आज त्या संस्थेच्या जिल्हा महिला कार्यप्रमुख आहे.

मुलांना वह्या पुरवणे, कधी त्यांची फी भरणे, त्यांना अभ्यासात मदत त्या कायम करीत असतात. एखादी मुलगी आठवीतच शाळा सोडत असेल तर प्रयत्न करावे लागतात.संस्थेतर्फे जिल्ह्यात सुरू असलेल्या १९ संस्कार वर्गात विविध शिक्षिका कार्यरत आहेत. नुकतेच द्वारकाधीशाच्या मंदिरात १३३ मुलांचा बालसंगम हा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांकरीता ११ शिवण मशीन देण्यात आल्या. महिला, बालकांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबिर, मोतीबिंदू शस्त्रक्रिया विनामूल्य केले जाते. महिलांचे हिमोग्लोबिन तपासून त्यांना पोषण आहार दिला जातो.



वृक्षारोपणासारखे कार्यक्रम वनवासी कल्याण आश्रम राबवत असते. या कामात मला खूप कार्यकर्त्यांचे सहकार्य मिळत असल्याचे सुचेता जोशी सांगतात. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना अहिल्या बाई होळकर पुरस्कार, रसायनी टाइम्सकडून पुरस्कार, ब्राम्हण सभा रसायनीकडून पुरस्कार, रोटरी क्लब पातळगंगा यांच्याकडून गौरविण्यात आले आहे.

**-बी.एस.कुलकर्णी, रसायनी**

# बुरूडकाम जीवंत ठेवणाऱ्या योगिता गायकवाड

माणगाव तालुक्यातील तळेगांव येथील योगिता गायकवाड यांचे पोलादपुरातील चोळई येथील बुरूडवस्तीमध्ये राहणाऱ्या एकनाथ गायकवाड यांच्यासोबत १९९१मध्ये लग्न झाले. पती वाहन चालवित असल्याने संसाराकडे फारसे लक्ष नसायचे. म्हणून संसाराला हातभार लावण्यासाठी त्यांनी बुरूडकामाचा पारंपरिक व्यवसाय सुरू करण्याचे ठरविले.

मुलांच्या शिक्षणादरम्यान काही कमी पडू नये यासाठी एकनाथ आणि योगिता वहिनींनी आपआपले व्यवसाय सांभाळून संसारात आणि संस्कारात दोन्ही अपत्यांचे पालनपोषण केले. चोळई बुरूडवाडीतील अन्य महिलांनाही अशा प्रकारच्या बुरूडकलेच्या माध्यमातून योगिता वहिनींनी प्रोत्साहित केले. गणपती गौरीच्या सणाला सुहासिनींचे माहेरवाशिणीचे गौरीचे वसे घेऊन जाण्यासाठी लागणारी बांबूची सुपे, सुपल्या तसेच परड्या, करंड्या, पाट्या, कणगे, डालगे, टोपल्या, चटई, सुपे, रवळया तसेच शो-पीस बनवून पोलादपूर शहरात विक्रीसाठी उपलब्ध करण्याचा व्यवसाय कुटूंबाची आर्थिक स्थिती भक्कम असूनही या गायकवाड कुटूंबाने परंपरा म्हणून जोपासलेला दिसून येत आहे.



राज्यातील नवीन बुरुडांची नोंदणी करणे तसेच बुरुड कारागिरांना स्वयंरोजगाराला प्रोत्साहन मिळावे म्हणून स्वामित्व शुल्क न आकारता बांबूचा पुरवठा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला असून स्वामित्व शुल्कातील सवलत प्रतिकुटुंब प्रतिवर्षी १५०० बांबू इतक्या मर्यादेत देण्याचाही निर्णय घेतला आहे, अशी माहिती देताना बँकांनी आणि उद्योग विभागाने तसेच केंद्रसरकारच्या सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयानेही बुरूड समाजाच्या या पारंपरिक व्यवसायाचा विश्वकर्मा योजनेमध्ये समावेश करून कर्जवाटप केल्यास कोकणातील नारळाच्या सालींपासून विविध वस्तुंची निर्मिती करणाऱ्या महिलांप्रमाणेच बुरूड समाजातील महिलादेखील नेटाने व्यवसाय करून शेती आणि संसारोपयोगी वस्तूंप्रमाणेच पर्यटनदृष्ट्या चांगली बाजारपेठ निर्माण करणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करू शकतील. बुरूड समाज म्हणून कलेला आणि कलेमुळे निर्माण झालेल्या जातीला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम योगिता एकनाथ गायकवाड यांच्या हातून सहज आणि सततच्या कामामुळे नकळत निर्माण झाले आहे.

**-शैलेश पालकर, पोलादपूर**

# अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अटल सेतू

**मुंबईला भारताच्या मुख्य भूभागाशी जोडणारे अंतर कमी करणारा आणि प्रवासाच्या वेळेत बचत करणारा अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू १२ जानेवारीपासून खुला झाला. मुंबईसह परिसराची सर्वांगिण उन्नती साधणारा, प्रवाशांच्या सुरक्षेची काळजी घेणारा आणि मुंबई शहराच्या चौफेर विस्तारासाठी सहाय्यभूत ठरणारा हा सेतू विकासाची गॅरंटी दर्शवत आहे. या अटल सेतूबाबतची सविस्तर माहिती देणारी लेखांची मालिका दै. रामप्रहरच्या वाचकांसाठी देत आहोत...**

## विकासाची गॅरंटी

सागर, जमीन आणि दलदल अशा तीनही भागांमध्ये उभारलेला सुमारे २१ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी तीन स्थापत्य कंत्राटदार, एक इंटेलिजन्ट ट्रान्सपोर्ट सिस्टिम कंत्राटदार, विविध १० देशांतील विषयतज्ज्ञांनी आपले योगदान दिले असून १५००हून अधिक अभियंते, तर सुमारे १६,५०० कुशल मजुरांनी तीन पाळ्यांमध्ये अहोरात्र काम केले आहे. या प्रकल्पामध्ये सुमारे १.२ लाख टन स्टील वापरण्यात आले आहे. इतक्याच स्टीलमध्ये चार हावडा ब्रिज उभारले जाऊ शकतात. प्रकल्पासाठी आठ लाख ३० हजार क्युबिक मीटर काँक्रीटचा वापर झाला आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटी उभारण्यासाठी लागलेल्या काँक्रीटपेक्षा हे सहापट अधिक आहे, तर या प्रकल्पात वापरण्यात आलेले स्टील आयफेल टॉवरमध्ये वापरले गेलेल्या स्टीलच्या १७ पट अधिक आहे. सुमारे एक हजार खांबांवर उभारल्या गेलेल्या या मार्गावर १०० किमी प्रती तास वेगाने प्रवास करता येणार असून दररोज सुमारे ७० हजार वाहने वाहून नेण्याची याची क्षमता आहे.

या पुलावरून चारचाकी सर्व प्रकारची वाहने यावरून धावतील, पण दुचाकी, ऑटोरिक्षा, सायकल आणि हातगाड्या यावरून जाऊ शकणार नाहीत कारण सुरक्षेचा विषय आहे. दुसरा म्हणजे एका विशिष्ट स्पीडने गाडी चालवावी लागते त्यामुळे ट्रॅफिक सुरळीत सुरू राहते, तसेच टोलबाबतही सरकारने नोटिफिकेशन काढले आहे. टोल द्यावा लागणार आहे, कारण जपान सरकारच्या जायका या आर्थिक संस्थेकडून कर्ज घेऊन उभारण्यात आला आहे. त्यामुळे या कर्जाची पण परतफेड करावी लागणार आहे. सरकारने इथे ओपन टोलिंगची सुविधा ठेवली आहे.

ओपन टोलिंगमध्ये कोणालाही थांबावे लागणार नाही. यामध्ये पावरफुल अशा आरएफआयटी स्कॅनरमार्फत तुमच्या गाडीवर लावलेल्या स्टिकरला तो स्कॅन करून टोल तुमच्या अकाऊंटमधून वसूल करेल. यामध्ये जे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम बसवण्यात आले आहे ते भारतातील सर्वांत अत्याधुनिक आहे. यामध्ये १९० थर्मल कॅमेरे आहेत कारण यामध्ये धुके आले, व्हिसिबिलिटी कमी झाली तरी हे कॅमेरे ते टिपू शकतील. गाडी थांबली, खराब झाली किंवा गाडीतून कोणी उतरले तरीदेखील हे कॅमेरे ते टिपू शकतात. निश्चित केलेल्या वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने जर कोणी गाडी चालवत असेल तर तेदेखील या कॅमेरॅत टिपले जाईल. वेग मर्यादेचेदेखील नोटिफिकेशन सरकारने काढले आहे.

अटल सेतूसाठी अत्याधुनिक जपानी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. याची एकूण लांबी २२ किमी असून यापैकी १६.५ किमीचा भाग समुद्रात आणि सुमारे ५.५ किमीचा भाग जमिनीवर उन्नत स्वरूपात आहे. यावर दोन्ही बाजूंना प्रत्येकी तीन मार्गिका असणार आहेत. पूर्व द्रुतगती मुक्तमार्ग हा जोडला गेला आहे आणि पूर्व-पश्चिम असणारा वरळी-शिवडी उन्नतमार्ग हा भविष्यात अटल सेतू प्रकल्पास जोडला जाणार आहे. यामुळे मुंबई सागरी किनारा रस्त्याद्वारे दक्षिण मुंबई आणि पश्चिम उपनगरातून येणाऱ्या प्रवाशांना अटल सेतूद्वारे विनाथांबा मुख्य भूमीकडे जाणे शक्य होणार आहे. साहजिकच प्रवासाचे अंतर कमी झाल्याने आणि एक तासाहून अधिक प्रवास वेळेची बचत होणार असल्याने हरितगृह वायू उत्सर्जनसुद्धा कमी होणार आहे.

पुलाच्या दुसऱ्या बाजूला, नवी मुंबईतील उलवे येथील शिवाजीनगर, उरण-पनवेल राज्य महामार्ग आणि मल्टीमॉडेल कॉरिडॉरवर चिर्ले येथे आंतरबदल (इंटरचेंज) करण्यात आले आहेत. याद्वारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, पुणे किंवा गोवा येथून प्रवासी जड वाहने सहजतेने मुंबईत प्रवेश करू शकतील. हा सेतू मार्ग विविध जोडरस्त्यांनी मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, वसई-विरार, नवी मुंबई, रायगड जिल्ह्याला जोडला जाणार असल्याने यामधील अंतर कमी होणार आहे. या प्रकल्पामध्ये भारतातील पहिल्या ओपन रोड टोलिंग प्रणालीचादेखील वापर करण्यात आला आहे. **(क्रमश:)**

**-नितीन देशमुख**



# खारघरची मॅरेथॉन वुमन : लक्ष्मी झा

लक्ष्मी झा या खारघर येथील शाळेत शिक्षिका आहेत, पण आजपर्यंत त्यांनी वेगवेगळ्या शहरातील ७०पेक्षा जास्त मॅरेथॉनमध्ये भाग घेऊन अनेक विजेतेपदे मिळवली. नाशिक आणि केरळमधील नॅशनल स्पर्धेतही भाग घेतला.

त्यांनी सुरुवातीला इतर महिलांप्रमाणे चालण्याची सुरुवात केली होती. त्यानंतर श्री. रामशेठ ठाकूर क्रीडा व सामाजिक विकास मंडळातर्फे आयोजित २०१९मध्ये खारघर येथे झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत त्यांनी भाग घेतला. त्यातून धावण्याची आवड निर्माण झाली. त्यानंतर मागे वळून पहिलेच नाही. त्यांचे पती आणि मुलेही त्यांना प्रोत्साहन देतात. त्यामुळे आज त्यांची ओळख एक खेळाडू म्हणून निर्माण झाली आहे. त्याचे श्रेय त्या खारघर मॅरेथानचे आयोजकांनाच देतात.



महिला दिनानिमित्त त्या आपल्या मैत्रिणी आणि इतर महिलांना सांगतात की, आपल्या रोजच्या दिनचर्येतून थोडासा वेळ काढा कारण आपली तंदुरुस्ती आपल्यासाठी आणि आपल्या परिवारासाठी गरजेचे आहे. महिला ही आपल्या कुटुंबाचा महत्त्वाचा खांब असते. त्यामुळे आपल्या कुटूंबासोबतच आपलीही तंदुरुस्ती राखणे गरजेचे आहे.

# सामाजिक कार्यकर्त्या विमल गायकवाड

नवीन पनवेलमध्ये राहणाऱ्या विमल गायकवाड या मुंबईतील परळ येथील सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल मध्ये शिक्षिका आहेत. येथे शाळेतील विद्यार्थी गरीब कुटुंबातील असल्याने ज्ञानदानाबरोबरच या मुलांना येणाऱ्या अडचणी सोडवण्याकडे त्यांनी लक्ष दिले. झोपडपट्टीत राहणाऱ्या महिला जुनाट रूढी, परंपरेच्या विळख्यात अडकलेल्या त्यांनी पाहिल्या. त्यांचे गैरसमज दूर करून त्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू केले असतानाच त्या पनवेलमधील आश्रय सोशल फाउंडेशन या संस्थेच्या संपर्कात आल्या. मग त्या माध्यमातून त्यांनी २००४पासून देहविक्री करणाऱ्या महिलांसाठी काम सुरू केले. आजपर्यंत तीन हजार महिलांशी संपर्क करून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांना शासनाच्या योजना मिळवून दिल्या. महिला सबलीकरणासाठी २० महिला बचत गटांची स्थापना करून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली.



महिला दिनाबद्दल बोलताना त्या म्हणतात, महिला ही प्रत्येक बाबतीत स्वतंत्र आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. तिला प्रोत्साहन देऊन सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

# सामाजिक कार्यकर्त्या ज्योती मगरे

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील असलेल्या ज्योती मगरे या २००२मध्ये लग्न झाल्यावर मुंबईला आल्या. कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी अलर्ट इंडिया या सामाजिक संस्थेत कामाला सुरुवात केली. आज त्या पनवेलमधील लोकपरिषद या एड्सग्रस्त, देहविक्री करणाऱ्या महिला व बारबाला यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्थेत काम करीत आहेत.

त्या रहात असलेल्या बिल्डिंगमध्ये एक विधवा महिला आपला मुलगा आणि मतिमंद मुलीसह रहात होती. ती एका कंपनीत कामाला जायची. मुलगाही कामाला जायचा. एक दिवस त्यांना त्या खोलीतून मुलीचा ओरडण्याचा आवाज आला म्हणून त्या बघायला गेल्या. फटीतून दिसले एक व्यक्ती त्या मुलीचे तोंड दाबून तिच्यावर अत्याचार करीत आहे. त्यांनी दरवाजा वाजवला पण त्याने उघडला नाही. अखेर आजूबाजूच्या लोकांना बोलावून दरवाजा तोडला आणि त्या मुलीची सुटका केली. त्या व्यक्तीला पकडून ठेवले. तुर्भे एमआयडीसी पोलिसांना बोलावले बराच वेळ पोलीस आलेच नाहीत. ते एफआरआय नोंदविण्यासही तर नव्हते. अखेर आपल्या संस्थेमार्फत दबाव आणल्यावर दोन दिवसांनी पोलिसांनी एफआरआय दाखल केला. आज आरोपीला शिक्षा झाली.



देहविक्री करणाऱ्या एका मुलीवर एका मुलाचे प्रेम होते. त्याला तिच्याशी लग्न करायचे होते, पण त्याचे घरचे तयार नव्हते. यांनी अनेक वेळा त्याच्या घरच्यांचे समुपदेशन केले. त्यानंतर त्यांचे लग्न झाले. मुली मोठ्या झाल्यावर त्यांना ही आपली आई करीत असलेल्या कामाचे महत्त्व समजल्याने त्यांनाही आईचा अभिमान वाटतो.

**-नितीन देशमुख, पनवेल**

## चित्रकार चंद्रकला कदम



अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रकला कुमार कदम यांना तेजस्विनी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. चंद्रकला यांनी आतापर्यंत अनेक मान्यवर संस्थांसाठी तैलचित्रे तयार केलेली असून त्यात भारतीय संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात लावण्यात आलेले स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांचे तैलचित्र तसेच महाराष्ट्र विधान भवनातील महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, दादासाहेब मावळंकर, यशवंतराव चव्हाण, अहिल्याबाई होळकर, इंदिरा गांधी, एस.एम. जोशी, मुंबई उच्च न्यायालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई विद्यापीठातील शाहीर अमर शेख, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, न्या. महादेव गोविंद रानडे, मौलाना अब्दुल कलाम आझाद, लोकमान्य टिळक, सी.डी.देशमुख, जगन्नाथ शंकर शेठ, शंकर दयाळ शर्मा आदींचा समावेश आहे. गुजरात विधान भवनातील स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांचे तैलचित्रही सौ. चंद्रकला यांनीच तयार केलेले आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेचे कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिर व डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले रंगमंदिर, पनवेल महापालिकेच्या (तत्कालीन नगरपालिकेच्या) क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, नांदेड-वाघाळा महापालिकेचे नांदेड येथील स्व. शंकरराव चव्हाण नाट्यसंकुल, ठाणे महापालिकेचे गडकरी रंगायतन तसेच इचलकरंजी नगरपालिकेचे श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यमंदिर या नाट्यगृहांसाठीही नाट्यक्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींची तैलचित्रे चंद्रकला यांनी तयार केली आहेत.


नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयामधील सभागृहातील तसेच वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहातील सर्व तैलचित्रे त्याचप्रमाणे महापालिकेने उभारलेल्या लोकशाहीर स्व. अण्णाभाऊ साठे स्मृती भवनातील स्व. अण्णाभाऊ साठे यांचे तैलचित्र चंद्रकला यांनी तयार केलेले आहे.

अलिबाग तालुक्यातील धोकवडे येथे जन्मलेल्या आणि शालेय वयातच चित्रकलेची आवड असलेल्या चंद्रकला कदम (पूर्वाश्रमीच्या म्हात्रे) यांनी घरची परिस्थिती खास नसतानाही आपल्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळे सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून आपले शिक्षण जिद्दीने पूर्ण केले. अर्थात, कलेचे शिक्षण सुरू असतानाचा त्यांचा भर व्यक्तिचित्रणावर होता. त्या वेळी १९७७-७८ साली त्यांनी काढलेले स्वतःचे तैलचित्र बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात ठेवले गेले होते. आश्चर्य म्हणजे ते चित्र एका जर्मनबाईने विकत घेतले आणि चंद्रकला यांचा उत्साह विश्वासासह द्विगुणित झाला तसेच त्यांना अल्ट्रझा क्लबतर्फे शिष्यवृत्तीही देण्यात आली.

व्यक्तिचित्रण किंवा मनुष्याकृती काढण्याच्या कलेत चंद्रकला यांनी विशेष स्थान प्राप्त करताना एखाद्या व्यक्तीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास व त्यातील जीवंतपणा हे गुण आत्मसात केलेले आहेत. हे विशेष व वेगळे काम करताना त्यांच्याकडून कलेद्वारे पोलिसांना गुन्हेगार शोधण्यासाठी केली जात असलेली मदत फार मोलाची आहे. चंद्रकला यांनी गेली पंचेचाळीस वर्षे या क्षेत्रात मानाचे स्थान मिळविले आहे. मनोरंजनाबरोबर कलेच्या माध्यमातून त्यांनी केलेली ही एक भूषणावह समाजसेवा होय.

कलाकार हा कधीच निवृत्त होत नसतो अशी भावना ठेवणाऱ्या चंद्रकला कदम सध्या अलिबागनजीकच्या सोगाव येथे आपले सुखी जीवन अनुभवताना अथवा रंगवताना स्टुडिओत बसून आपल्या हातामधील बहुरंगी पॅलेट कधीच खाली ठेवणार नाही हे निश्चित.

**(संकलन : प्रकाश सोनवडेकर)**



## आदर्श महिला निलिमा भोसले



भारतीय महिलांसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले कोणाएका देवीपेक्षा कमी नाहीत. सावित्रीबाईंनी स्त्रियांना दिलेल्या या ऊर्जेचा खरा स्रोत महाडच्या निलिमा राजेय भोसले यांच्या अंगी दिसून येतो.

मुंबईतली मध्यमवर्गीय सुखी कुटुंबातील निलिमा यांचा १९९९मध्ये महाडचे राजेय भोसले यांच्याशी विवाह झाला. महाडच्या राजकारणात सक्रिय असलेल्या भोसले कुटुंबात निलिमांना हे सगळं नवीन होतं. मुळात राजकारण या विषयात रस नसलेल्या निलिमा यांना कुटुंबाच्या सेवेत राहणं, मुलांच शिक्षण, उत्तम स्वयंपाक यातच आवड होती. पतीचं राजकारण आणि व्यवसाय यात त्यांनी कधीच ढवळाढवळ केली नाही. मनमिळावू असणारे राजेय भोसले यांचं समाजात एक वेगळं स्थान होतं. कोरोना काळात स्वतःच्या जीवाची परवा न करता ते लोकांच्या मदतीसाठी लॉकडाउनमध्ये बाहेर पडले, मात्र गोरगरिबांची सेवा करताना त्यांच्यावरच कोरोना व्हायरसने हल्ला केला. या लढाईत राजेय यांचा मृत्यू झाला. दुःखाचा कोसळलेला डोंगर बाजूला सारून निलिमा भोसले घराबाहेर पडल्या.

पतीचा व्यवसाय सांभाळताना निलिमा यांना खूपच संघर्ष करावा लागला. काही वर्षांपूर्वीच राजेयचे मोठे बंधू कर्करोगाने वारले होते. त्यातच दोन मुलांचे शिक्षण आणि दोन कुटुंबांची जबाबदारी निलिमांवर आली होती, पण न डगमगता त्यांनी खंबीरपणे पतीचा फोर्कलिफ्टचा व्यवसाय संभाळला. नुसता सांभाळलाच नाही तर अनेक संकटांवर मात करून त्यात वाढ केली. ही बाई काय करणार आहे? या अविर्भावात अनेक विरोधक त्यांचे हे कंत्राट ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करीत होते, पण या वाघिणीने कंबर कसून मैदानात उतरली होती.

म्हणतात ना जेव्हा प्रत्यक्ष पार्वती कालीच्या रूपामध्ये युद्धात उतरते तेव्हा तिला हरवण्याची ताकद कोणातच नसते. आज निलिमाताईंनी मुलीला वकील केलं आहे, तर मुलगा उच्च शिक्षण घेत आहे.

निलिमा भोसले यांनी पतीप्रमाणे स्वतःलादेखील समाजकार्यात वाहून घेतलं असून गोरगरीब महिलांच्या मदतीसाठी त्या सतत कार्यरत असतात. पतीच्या पावलावर पाऊल टाकत राजकारणातही त्यांनी आपला जम बसवला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांनी प्रभावित होऊन भाजप महिला मोर्चाच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी कार्यरत आहेत.

फोर्कलिफ्टसारखा नवीन आणि महिलांनी कधीच न केलेल्या व्यवसायात निलिमा भोसले यांनी केलेलं काम आणि मिळवलेलं प्राविण्य कौतुकास्पद आहे. त्याचप्रमाणे त्यांचे कार्य इतर महिलांसाठी आदर्शवत आहे.

**-महेश शिंदे, महाड**

## उद्योजक छाया करडे

म्हसळा तांबट आळीतील छाया सुधीर करडे या ३ जानेवारी १९८३मध्ये रोहा अष्टमी येथून विवाहानंतर येथे स्थायिक झाल्या. तेव्हाच्या म्हसळ्यासारख्या खेडेगावात एकत्र आणि मोठ्या कुटुंबात छोट्या जागेत रहाणे या आव्हानात्मक परिस्थितीला त्या आत्मविश्वासाने सामोऱ्या गेल्या.



त्यांनी आपल्यासोबत कुटुंबाची आर्थिक घडी बसविणे गरजेचे आहे तरच शैक्षणिक, बौद्धीक, आध्यात्मिक, प्रापंचिक विकास होईल म्हणून पती सुधीर यांच्या पारंपरिक तांबट (भांडी घडविणे) व्यवसायाला आणि कुटुंबाला मदत व्हावी म्हणून महिला उद्योग करावा या हेतूने गृह उद्योगाला सुरुवात करण्याचे निश्चित केले.

घरपोच जेवणाचे डबे, पार्टटाईम हीरा घंटीवर काम, ओम स्वामी समर्थ साधाना केंद्र वडघर-पांगळीली (ता. श्रीवर्धन) येथील मठात सेवार्थ व अर्थाजनासाठी दाखल, त्याचवेळी कौटुंबिक व्याप्ती पाहता या व्यवसायाला जोड व्यवसाय म्हणून घरगुती मसाले, विविध प्रकारच्या भाजण्या, मोदकाचे, भोकवाल्या वड्याचे, भाजणीचे पीठ, मेथी, डिंक, आळीव, रवा-बेसन लाडू घरपोच विक्री व्यवस्था सुरू केली. त्याचबरोबर तांबे-पितळ भांडी व दुर्मिळ वस्तूंची मुंबई, नवी मुंबई परिसरात विक्रीस सुरवात केली. माल खरेदी करण्यास रोहा अष्टमी येथील व्यापारी मिलिंद पिंपळे आणि उरण येथील मुलगी गौरी आणि जावई शैलेश समेळ यांची मोलाची मदत होते, असे छाया काकूंनी आवर्जून सांगितले. त्यांचा व्यवसाय हा स्थानिक महिलांना स्फूर्ती देणारा ठरत असून शहरात महिला व्यवसायिक वाढत आहेत.

**-संजय खांबेटे, म्हसळा**

## ग्रामसेविका नम्रता तरडे



शासनाचे लोकाभिमुख अभियान आपण ज्या ग्रामपंचायतीत काम करतोय, त्या ठिकाणी यशस्वीपणे राबवून व शासकीय विविध योजनांचा लाभ जनतेला मिळवून देण्यासाठी आपल्या कारकिर्दीत नेहमीच प्रयत्नशील राहणाऱ्या ग्रामसेविका नम्रता नरेश यांचे नाव आदराने व आपुलकीने घेतले जाते.

नम्रता तरडे या मूळच्या रवाळजे (ता. माणगाव) येथील रहिवासी असून नोकरीनिमित्त माणगाववासी झाल्या आहेत. सध्या त्या तालुक्यातील कदापि ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका म्हणून काम पाहत आहे. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण कुंडलिका विद्यालय पाटणूस या ठिकाणी झाले असून त्यांनी कोकण कृषी विद्यालय रोहा या ठिकाणी कृषी पदविका घेतली. त्यानंतर २३ सप्टेंबर २००५ रोजी तळा पंचायत समिती अंतर्गत ग्रामसेविका म्हणून शासकीय सेवेत रूजू झाल्या. आपल्या सेवेशी प्रामाणिक राहत त्यांनी ग्रामसेविका म्हणून विविध ग्रामपंचायतींमध्ये काम करताना ग्रामस्थांना शासनाच्या विविध लोकाभिमुख योजनांची माहिती देऊन जनजागृती केली व त्यांना त्याचा लाभ कसा मिळेल यासाठी प्रयत्न व कार्यवाही केली.

शांत व मनमिळावू स्वभावाच्या असणाऱ्या ग्रामसेविका तरडे आपल्या सेवेशी तत्पर राहिल्या असल्याने त्यांनी समाजात आपली विशेष ओळख निर्माण केली आहे.

त्यांनी माणगाव तालुक्यातील शासनाच्या निर्मल ग्राम व तंटामुक्त गाव पुरस्काराचे मानकरी ठरलेल्या साळवे व कडापे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेविका म्हणून चांगले केलेले आहे. शासनाच्या विविध योजना, अभियान अत्यंत प्रभावीपणे त्यांनी त्या-त्या ग्रामपंचायत हद्दीत राबविली आहेत तसेच कोविड-१९च्या संकटकाळात यावर मत करण्यासाठी त्यांनी साळवे-कडापे ग्रामपंचायतीत काम करताना विविध उपाययोजना सरपंच, उपसरपंच, सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थांच्या सहकार्याने राबविल्या. ३ जून २०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळातही त्यांनी आपल्या सेवेशी तत्पर राहत काम केले. अशा प्रकारे आपल्या पदाचा वापर जनसेवेसाठी त्या करीत आहेत.

**-सलीम शेख, माणगाव**

## समाजसेविका जान्हवी पाटील



आयुष्य सुंदर होण्यासाठी संवादाची गरज असते असे टेलिफोनचे निर्माते ग्रॅहम बेल यांनी म्हटले होते. मग तो संवाद शब्द, जाणिव, गरजांच्या पातळीवर झाला तरी त्याची व्यापकता वाढत जाते. आपुलकी सामाजिक संस्थेच्या जान्हवी विनोद पाटील यांच्या बाबतीतही असेच घडले. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या जान्हवी यांची हळूहळू शब्दांशी वीण घट्ट होत गेली. त्यांचे अनुभव, वाचन, विचार, दृष्टिकोन यांचा अंतर्भाव त्यांच्या लिखाणात झाला व त्यांची लेखणी बहरत गेली. स्वतःमध्ये 'पॉझिटीव्ह' बदल करून ते लोकांपर्यंत संक्रमित करण्याचे धारिष्ट, समाजसेवेचा वसा यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्वाचा पोत चमकत गेला. हळूहळू त्याची नोंद लोकांनी घेतली. त्यांनी जपलेल्या सामाजिक कामाची दखल घेऊन अनेक सामाजिक संस्थांकडून गौरविण्यात आले.

लहानपणी घरची परिस्थिती अगदी बेताची असल्याने जान्हवी पाटील यांच्या कुटुंबाला खूप मेहनत करावी लागत होती. वयाच्या आठव्या वर्षांपासून जान्हवी आईसोबत कामाला हातभार लावायला जात असे. कदाचित यावर विश्वास बसणार नाही, पण अनेकदा शाळेला दांड्या मारून जान्हवी स्वतः हून कधी मजुरांच्या हाताखाली पाणी द्यायला, तर कधी सिमेंटची घमेली उचलायला जायची. ज्या वयात खेळायचं बागडायचं त्या वयात मेहनत करून कुटुंबाला हातभार लावण्याची जबाबदारी जान्हवीने उचलली. आई-वडील कष्ट करतात, आपणही मदत केली पाहिजे या विचाराने तिने बालवयात काबाडकष्ट केले आणि येथूनच जान्हवी सामाजिक कार्याकडे आपोआप वळली. आपल्या आजूबाजूला कोणाच्याही मदतीला जाणे, कोणावर अन्याय होत असेल, तर त्याविरोधात आवाज उठवणे हे सगळे जान्हवी शालेय वयात करीत असे, असे तिचे पालक सांगतात.

केवळ नोकरी करून पैसे कमवून कुटुंबाला हातभार लागावा यासाठी जान्हवी पत्रकारिता क्षेत्रात आली आणि खऱ्या अर्थाने तिच्या सामाजिक कामाला गती मिळाली. आपुलकी नावाच्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अनेक उपक्रम जान्हवी यांच्या टीमने रत्नागिरीत घेतले. गेली १० ते १२ वर्षे मनोरुग्णांसाठी सांस्कृतिक उपक्रम घेणे, भाऊबीज, रक्षाबंधन, तर कधी त्यांनी बनवलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. याशिवाय गुन्हेगारांची मानसिकता बदलावी यासाठी रत्नागिरी कारागृहात कार्यक्रम घेतले. यात महिला बंदीसाठी मार्गदर्शन वर्गही त्यांनी घेतले आहेत. अनाथ मुलांची दिवाळी गोड व्हावी यासाठी भाऊबीज भेट कार्यक्रम घेतले. याच अनाथ मुलांना जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व इतर अधिकाऱ्यांशी संवाद साधता यावा यासाठी अधिकारी संवाद उपक्रमही राबवले आहेत.

**(संकलन : प्रकाश सोनवडेकर)**

## रिक्षाचालक भाग्यश्री शेकटे



कोरोनाने कर्जत तालुक्यातील पोशीर गावातील भगवान शेकटे या रिक्षाचालक तरुणाला ग्रासले आणि त्या महामारीमध्ये त्यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या पत्नीवर कुटुंब चालविण्याची जबाबदारी आली. काय करावे हे सुचत नव्हते. शेवटी गंभीर परिस्थिती उदभवली आणि त्या महिलेने मागचा पुढचा विचार न करता कुटुंबासाठी रिक्षेचे स्टेअरिंग हाती घेतले. आता त्या पुरुषांच्या बरोबरीने रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांचे नाव आहे भाग्यश्री भगवान शेकटे.

भाग्यश्री शेकटे मूळच्या सावळे गावातील. त्यांचे माहेरचे नाव ललिता मनोहर दळवी. शिक्षण नववीपर्यंत झाले आहे. त्यांचे लग्न ६ जून २००६ रोजी पोशीर गावातील भगवान शेकटे यांच्याशी झाले. शेकटे रिक्षाचालक होते. या उभयतांना दोन मुली, दोन मुले अशी चार अपत्ये. त्यांचा संसार एकदम मस्त चालला होता, मात्र या आनंदी संसाराला दृष्ट लागली. भगवान शेकटे यांना कोरोनाची लागण झाली आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. शेकटे यांच्या रिक्षेच्या व्यवसायावर संपूर्ण कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत असे. कधीही घराबाहेर न पडलेल्या भाग्यश्री यांना काय करावे? हे सुचत नव्हते. सामाजिक बांधिलकी संघटनेने त्यांना रिक्षा चालवण्याचा मार्ग सुचवला.

आता आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी भाग्यश्री शेकटे पोशिर ते नेरळ, कळंब या मार्गाने रिक्षा चालवून आपला प्रपंच चालवत आहेत. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. असा त्यांचा महिलांना मोलाचा सल्ला आहे.

**-विजय मांडे, कर्जत**

## नृत्य कलाकार काजल पाखुर्डे



माणगाव शहरासह रायगड जिल्ह्याचे नाव राज्याच्या क्षितिजावर पोहचवणारी चमकती तारका म्हणजे काजल अजित पाखुर्डे. काजलने कला क्षेत्रात उडी घेत प्रसिद्ध कोरिओग्राफर फुलवा खामकर यांच्याकडे पाच वर्षे नृत्याचे प्रशिक्षण पूर्ण करून माणगावात काजल कला नृत्य सांस्कृतिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या गोरेगाव (लोणेरे), निजामपूर, इंदापूर या ठिकाणी शाखा आहेत. सन २०१७मध्ये खामकर यांच्यासमवेत पाणी फाउंडेशनमध्ये तिने टीव्ही शो केला असून व्हिडीओ अल्बम आणि शॉर्ट फिल्ममध्ये अभिनय करून आपली विशेष छाप पाडली आहे.

माणगावात बीएससीपर्यंत प्रतिकूल परिस्थितीत काजलने शिक्षण पूर्ण केले. वडील अजित पाखुर्डे यांनी चालक म्हणून लहान-मोठी वाहने चालवून कुटुंबांचा उदरनिर्वाह भागवून कन्या काजलला तिच्या आवडीप्रमाणे नृत्य कला क्षेत्रात प्रोत्साहन दिले. याकामी वडिलांबरोबरच तिची आई कल्पना यांनीही काजोलच्या कला क्षेत्रातील पसंतीला उत्तेजन देत तिला वेळोवेळी सहकार्य केले. काजलही आपल्या क्षेत्रात नेत्रदीपक काम करीत असतानाच लहान भाऊ अभिजित याच्या शिक्षणाकडेही तेवढ्याच पद्धतीने बारकाईने लक्ष ठेवीत आहे. पाखुर्डे कुटुंबियांचे नाव सातासमुद्रापलीकडे पोहचवण्यासाठी काजल आज आपल्या कला अकादमीतून गरुड भरारी घेत आहे. तिच्या अकादमीत १०० बाल कलाकार नृत्यकलेचे धडे घेत आहेत.

काजलने जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय नृत्य स्पर्धामध्ये परीक्षक म्हणून काम केले असून ५००पेक्षा अधिक स्पर्धांचा अनुभव तिच्या पाठीशी आहे. रोटरी क्लब ऑफ माणगावसारख्या अनेक मोठ-मोठ्या संस्था, संघटनांमधून आपल्या अकॅडमीतील नृत्य कलाकरांना तिने व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. माणगावसारख्या ग्रामीण भागातून कला क्षेत्रात नावलौकिक पटकावून काजलने ग्रामीण भागातील नृत्य कलाप्रेमींना नृत्यकलेचे प्रशिक्षण देऊन त्यांना घडविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**-सलीम शेख, माणगाव**

## धनुर्धारी तनिषा वर्तक



भारतीय खेळाच्या इतिहासामध्ये धनुर्विद्या हा अतिशय पारंपरिक खेळ राहिला आहे, पण स्वातंत्र्यानंतर या खेळाला लोकप्रियता आणि हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यामागे अनेक क्रीडा संघटनाना फारसे यश मिळालेले नसतानादेखील दीपिका कुमारी, जयंता तालुकदार, लिंबा राम, डोला बॅनर्जी, तरुणदीप रॉय, प्रवीण जाधव यांनी या खेळाला आणि भारताच्या ऐतिहासिक परंपरेला जागतिक पातळीवर दखल घ्यायला भाग पाडत कधी आशियाई खेळात, कधी जागतिक चॅम्पियनशिप स्पर्धेत, तर कधी राष्ट्रकुल स्पर्धेत खूप सारी पदके मिळवून दिली. अशा या धनुर्विद्या खेळाचे धडे सध्या परशुरामाच्या पवित्र कोकण भूमीत, छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या रायगड राजधानीत, नारळी पोफळीच्या सान्निध्यात वेढलेल्या अलिबाग तालुक्यातील नागाव या गावात कुमारी तनिषा मंदार वर्तक ही गिरवत आहे.

तनिषा वर्तक सेंट मेरी हायस्कूल अलिबागची विद्यार्थिनी असून सध्या ती सहावी इयत्तेत शिकत आहे. आई-वडिलांना खेळाची प्रचंड आवड, त्यातही मैदानी खेळामध्ये विशेष प्रेम असल्याकारणाने आपल्या घरातील एका मुलाने तरी खेळात करियर घडवावे यासाठी पालकांनी तनिषाला धनुर्विद्या खेळासाठी प्रोत्साहन आणि पाठिंबा द्यायचे ठरवले, परंतु अलिबागमध्ये या खेळाकरिता कोणत्याही सुविधा अथवा इनडोअर केंद्र नसल्याने तनिषाने आपला सराव नागावच्या वाडीतच करायचा ठरवला. समोरील नारळाच्या झाडावर बांधलेले बुल्सआय म्हणजे लक्ष्यकेंद्र, तर आजूबाजूचा असलेला वाऱ्याचा प्रभाव हे आपले आव्हान असे समजून तिने प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली.

महाड येथील संतोष जाधव यांच्याशी आलेल्या संपर्कातून तनिषाने बावलेकर आर्चरी अकादमी अलिबाग (केळकर प्रशिक्षण विद्यालय) येथे आधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण घ्यावयास सुरुवात केली आणि येथून सुरू झालेल्या प्रवासातून तिने पहिल्याच स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात लोधिवली (ता. खालापूर) येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळविला. यानंतर शाळेने क्रीडाशिक्षक यतिराज पाटील, अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनाने तनिषाला आपला सराव अधिक मजबूत करण्यास सहकार्य केले.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिने पुणे गाठले. फील्ड आर्चरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि पुणे जिल्हा फील्ड आर्चरी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या १३व्या राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेमध्ये शेकडो स्पर्धकांच्या गराड्यात आत्मविश्वास कुठेही न गमावता तनिषाने येथेदेखील रौप्यपदकाला गवसणी घातली आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. याच इनडोअर मैदानात झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने तृतीय क्रमांक पटकावून महाराष्ट्राचा मान वाढविला.

आपल्या जिल्ह्यात मुंबई-पुणे या शहरांसारख्या आश्वासक सुविधा नसतानादेखील तनिषा आता खेळातील सातत्य, एकाग्रता आणि फिटनेसवर अधिक लक्ष केंद्रित करीत आहे. सुदैवाने हल्लीचे राज्य व केंद्र सरकार खेळ आणि खेळाडूंना पाठबळ देत आहे. तरीही जगावेगळी वाट पकडायला धाडस आणि पंखात बळ निर्माण करण्यासाठी आत्मविश्वास आवश्यक असतो. तनिषा वर्तककडे हे दोनही गोष्टी आहेत. गरज आहे ती आधुनिक सुविधांची, ज्यामुळे भविष्यातील भारताचे जागतिक पदक या तेजस्विनीच्या रूपात मिळाले तर आश्चर्य वाटायला नको! **(संकलन : प्रकाश सोनवडेकर)**

# पहिल्या दिवशी भारताचे वर्चस्व

## इंग्लंडचा डाव गडगडला; कुलदीपच्या पाच विकेट्स



**धरमशाला : वृत्तसंस्था**

भारताने पाचव्या व शेवटच्या कसोटी सामन्यात गुरुवारी (दि.७) पहिल्या दिवशी दमदार कामगिरी केली. भारताने इंग्लंडचा पहिला डाव २१८ धावांवर संपुष्टात आणला. त्यानंतर दिवसअखेर एक बाद १३५ अशी धावसंख्या उभारली आहे.

इंग्लंडच्या २१८ धावांचा पाठलाग करताना भारताने झंझावाती सुरुवात केली. रोहित शर्माने चौकारासह आपल्या खेळीची सुरुवात केली. यशस्वीही मागे राहिला नाही. या दोघांनी इंग्लंडच्या गोलंदाजीवर सुरुवातीपासून धडाकेबाज फटकेबाजी करायला सुरुवात केली. इंग्लंडने थोड्या वेळाने फिरकीपटूंच्या हाती चेंडू सुपूर्द केला, पण यशस्वीने शोएब बशिरच्या एकाच षटकात तीन षटकार वसूल केले. त्यामुळे आता ही जोडी मोठी धावसंख्या उभारणार असे वाटत होते, मात्र यशस्वी अर्धशतक करून बाद झाला. त्याने पाच चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ५७ धावांची खेळी साकारली. यशस्वी बाद झाल्यावर रोहित शर्माने गिलच्या साथीने धावांची गती वाढवायला सुरुवात केली. रोहितनेही आपले अर्धशतक पूर्ण केले. रोहित ५२ आणि शुभमन २६ धावांवर खेळत आहे.

तत्पूर्वी, भारताच्या फिरकीपटूंनी पहिला दिवस गाजवला. कुलदीप यादवने तर इंग्लंडच्या फलंदाजांना आपल्या तालावर नाचवले आणि पाच बळींचा टप्पा गाठला. शंभरावी कसोटी खेळत असलेल्या रविचंद्रन अश्विनने चौघांना माघारी पाठवले, तर रवींद्र जडेजाने एक गडी बाद केला. यानंतर फलंदाजी करताना भारताने पहिल्या दिवसअखेर एक बाद १३५ धावा केल्या असून ते ८३ धावांनी पिछाडीवर आहेत. दुसऱ्या दिवशी मोठी धावसंख्या उभारण्याची भारताला संधी आहे.

# सुकापूरमध्ये सरपंच चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर ग्रामस्थ मंडळ आणि सुकापूर प्रीमियर लीगच्या वतीने सरपंच चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि.७) झाले. सुकापूरच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानात १० मार्चपर्यंत ही स्पर्धा सुरू आहे.

दरम्यान, आदर्श सरपंच म्हणून सुकापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता पाटील यांना राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते नवराष्ट्र सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सरपंच योगिता पाटील यांचा सन्मान केला.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक समीर ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य पुष्पा म्हसकर, अनिता पाटील, प्राची जाधव, माजी उपसरपंच अलुराम केणी, हनुमंत खुटले, विनायक शेळके, आत्माराम पाटील, अनंता पाटील, संजय पाटील, कृष्णा म्हात्रे, चांगदेव ठाकूर, चांगदेव पवार, मोहन दळवी, जनार्दन पाटील, पोलीस पाटील रोशन जाधव, नितीन पोपेटा, प्रमोद पोपेटा, प्रशांत म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# भारतीय संघाकडून अश्विनला 'गार्ड ऑफ ऑनर'

## १००व्या कसोटीनिमित्त मानवंदना

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा दिग्गज फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनने धर्मशाला कसोटीत मैदानात उतरताच इतिहास रचला. तो भारताकडून १००वी कसोटी खेळणारा १४वा खेळाडू ठरला. त्याच्याआधी तेरा खेळाडूंनी हा पराक्रम केला आहे. अश्विनची १००वी कसोटी संस्मरणीय करण्यासाठी त्याला धरमशाला येथील एचपीसीए स्टेडियमवर खास पद्धतीने टेस्ट कॅप देण्यात आली. या वेळी भारतीय संघाने अश्विनला गार्ड ऑफ ऑनरही दिला, तर सामन्यात अश्विन चार गडी बाद केले.

भारतीय खेळाडू स्टेडियममध्ये एका रांगेत उभे होते. समोर अश्विनची १००वी कसोटी कॅप स्मृतीचिन्ह



ठेवल्याप्रमाणे एका खास पद्धतीने पॅक करून ठेवली होती. पत्नी आणि दोन मुलींना बोलावून ते अश्विनच्या जवळ उभे राहिले. त्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी अश्विनबद्दल काही शब्द व्यक्त केले. मग त्यांनी अश्विनकडे १००वी टेस्ट कॅप देताच भारतीय खेळाडूंनी टाळ्या वाजवून त्याचे कौतुक केले. या वेळी अश्विनची प्रीती भावूक दिसत होती. सर्व खेळाडूंनी अश्विनला मिठी मारून अभिनंदन केले. बीसीसीआयने याबाबतचे अनेक फोटो शेअर केले आहेत.

अश्विनसाठी ही मालिका सोपी राहिलेली नाही. तिसऱ्या सामन्यात ५०० कसोटी विकेट्स पूर्ण केल्यानंतर अश्विनला अचानक घरी परतावे लागले. त्यानंतर त्याने पुनरागमन केले आणि ५०१वी विकेट घेतली.

## यशस्वी जैस्वालने टाकले विराटला मागे

*या सामन्यात युवा फलंदाज यशस्वी जैस्वालने इतिहास रचला आहे. त्याने विराट कोहलीला मागे टाकले आहे. सामना सुरू होण्यापूर्वी यशस्वीने या मालिकेतील चार सामन्यांत मिळून ६५५ धावा केल्या होत्या. त्याने धरमशाला कसोटीत खाते उघडताच या मालिकेत ६५६ धावा पूर्ण केल्या. यासह तो इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनला आहे. यापूर्वी हा विक्रम विराटच्या नावावर होता. विराटने २०१६मध्ये इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ६५५ धावा केल्या होत्या.*

# फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत श्रीकांत, सिंधूची विजयी सलामी

**पॅरिस : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक पात्रतेच्या शर्यतीत राहण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदम्बी श्रीकांत आणि पी. व्ही. सिंधू यांना पहिल्या फेरीत विजय मिळविले, पण यासाठी त्यांना प्रयत्नांची शिकस्त करावी लागली.

सिंधूने तब्बल एक तास २० मिनिटांच्या मॅरेथॉन लढतीनंतर कॅनडाच्या मिशेल लीचा २०-२२, २२-२०, २१-१९ असा पराभव केला. श्रीकांतने तैपेइच्या चोऊ टिएन चेनचे आव्हान २१-१५, २०-२२, २१-८ असे एक तास आणि सहा मिनिटांत संपुष्टात आणले. लु याने भारताच्या एच. एस. प्रणॉयचे आव्हान २१-१७, २१-१७ असे मोडित काढले.

# सचिनकडून पॅरा क्रिकेटपटूचा गौरव

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग टी-१० (आयएसपीएल)च्या पहिल्या सामन्यापूर्वी सचिन तेंडुलकरने जम्मू-काश्मीर पॅरा क्रिकेट संघाचा कर्णधार आमिर हुसैन लोनचा गौरव केला. आयएसपीएलचा पहिला चेंडू आमिरला खेळवायचे हे त्याचे स्वप्न होते. मुंबईत खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेतील अक्षय कुमारच्या खिलाडी इलेव्हन संघाकडून टाकल्या गेलेल्या पहिल्या चेंडूचा सामना आमिरने केला, जो सचिनच्या मास्टर इलेव्हनचा संघाचा सदस्य होता.

सामन्यादरम्यान आमिर गोलंदाजीसाठीही आला होता. त्याने पायाने गोलंदाजी केली आणि त्याचा सामना बिग बॉस विजेता मुनावर फारुकी आणि अभिनेता अक्षय कुमारने केला. आमिर जेव्हा गोलंदाजी करायला आला, तेव्हा सचिन तेंडुलकरने स्वतः विकेटकीपिंगची जबाबदारी घेतली. विकेट कीपिंग करतानाही तो टाळ्या वाजवून आमिरचे कौतुक करताना दिसला. यानंतर फलंदाजी करताना सचिनसह आमिर सलामीला आला. चाहत्यांनीही आमिरसह तेंडुलकरच्या मोठ्या मनाचे कौतुक केले.

वास्तविक, सचिन मैदानावर आमिरची जर्सी घालून दिसला होता. याशिवाय आमिरने सचिनची १० नंबरची जर्सी घातली होती. सचिनने आमिरच्या संपूर्ण कुटुंबाला आमंत्रित केले होते. सचिनने आमिरला क्रिकेटच्या मोठ्या मंचावर खेळण्याची संधी दिली. या वेळी मैदानावर उपस्थित सर्वांनी टाळ्या वाजवल्या.



**पनवेल : येथील महापालिका क्षेत्रातील नागरिकांना प्राथमिक उपचारांच्या उत्तम सुविधा मिळण्याच्या दृष्टीने तळोजातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, नावडे येथील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि तोंडरे येथील नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत इतर मान्यवर.**



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com